सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❏ वर्ष - ४ थे ❏ अंक - ५ वा ❏ अमरावती (महाराष्ट्र) ❏ शुक्रवार दि. २३ जानेवारी २०२६ ❏ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❏ मुल्य - १ रु. ❏ पृष्ठ -६

## काश्मीरमध्ये वाहन दरीत कोसळून १० जवान शहीद; अपघातात वाहनाचा चुराडा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३भद्रवाह**

जम्मू-काश्मीरच्या डोडा जिल्ह्यात सुरक्षा दलाचे वाहन खोल दरीत कोसळल्याने गुरुवारी झालेल्या भीषण अपघातात १० जवान शहीद, तर ११ जण जखमी झाले. ९ हजार फूट उंचीवरील भदरवाह-चंबा आंतरराज्यीय मार्गावरील खन्नी टॉपजवळ चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाला.

सुरक्षा दलाचे बुलेटप्रूफ लष्करी वाहन जवानांना घेऊन दहशतवादविरोधी अभियानासाठी जात होते. यादरम्यान चालकाचे नियंत्रण सुटल्याने अनियंत्रित वाहन खन्नी टॉप येथील २०० फूट खोल दरीत कोसळल्याने ही दुर्घटना घडली. हा अपघात एवढा भीषण होता की, बुलेटप्रूफ वाहनाचा चुराडा झाला. सुरक्षा दल व पोलिसांनी संयुक्तरीत्या

बचाव अभियान राबवत चार जवानांचे मृतदेह व जखमी जवानांना दरीतून बाहेर काढले. उपचारासाठी रुग्णालयात दाखल केल्यानंतर आणखी सहा जवानांचा मृत्यू झाला.

जखमी हा जवानांना अधिक उपचारासाठी उधमपूर येथील लष्करी रुग्णालयात एअरलिफ्ट केले आहे. एकावर भद्रवाह येथे उपचार सुरू आहेत.

**शोक व्यक्त**


राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, जम्मू-काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा, मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, माजी मुख्यमंत्री गुलाम नबी आझाद यांच्यासह अनेक राजकीय नेत्यांनी शहीद जवानांबद्दल शोक व्यक्त करत जखमींनी लवकर बरे व्हावे, यासाठी प्रार्थना केली.

## महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी बाळासाहेबांच्या दृष्टिकोनातून आम्हाला मोठी प्रेरणा मिळते

### पंतप्रधान नरेंद्र मोदींनी बाळासाहेबांना वाहिली आदरांजली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३नवी दिल्ली**

शिवसेनाप्रमुखबाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त आज त्यांना देशभरातून आदरांजली वाहिली जात आहे. पंतप्रधान नरेंद्र यांनीही बाळासाहेबांना आजरांजली वाहिली आहे. महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी बाळासाहेबांच्या दृष्टिकोनातून आम्हाला मोठी प्रेरणा मिळते आणि ती साकार करण्यासाठी आम्ही सदैव प्रयत्नशील राहू, असे नरेंद्र मोदी यांनी बाळासाहेबांना आदरांजली वाहताना म्हटले आहे.



समाजमाध्यमांवरून बाळासाहेब ठाकरे यांना आदरांजली वाहताना नरेंद्र मोदी म्हणाले की, महाराष्ट्राच्या सामाजिक-राजकीय परिदृश्यावर खोलवर प्रभाव टाकणारे दिवंगत मा. बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त, या दिग्गज व्यक्तिमत्त्वाला भावपूर्ण आदरांजली. तीक्ष्ण बुद्धिमत्ता, प्रभावी वक्तृत्व आणि ठाम विचारसरणीसाठी ओळखले जाणारे बाळासाहेब जनतेशी एक अद्वितीय नाते जपून होते. राजकारणाबरोबरच त्यांना संस्कृती, साहित्य आणि पत्रकारितेचीही विशेष आवड होती. व्यंगचित्रकार म्हणून त्यांच्या कारकिर्दीत समाजाचे सूक्ष्म निरीक्षण आणि विविध विषयांवरील निर्भय भाष्य दिसून येते. महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी त्यांच्या दृष्टिकोनातून आम्हाला मोठी प्रेरणा मिळते आणि ती साकार करण्यासाठी आम्ही सदैव प्रयत्नशील राहू, असे नरेंद्र मोदी म्हणाले.

दरम्यान, नरेंद्र मोदी यांनी बाळासाहेब ठाकरे यांना आदरांजली वाहताना त्यांच्यासोबतचे दोन जुने फोटोही शेअर केले आहेत. तसेच त्यामाध्यमातून पंतप्रधान मोदींनी त्यांच्यासोबतच्या दृढ संबंधांना उजाळा दिला आहे.

## धावत्या बसचा अचानक ब्रेक फेल

### चालकाच्या सतर्कतेमुळे जीवितहानी टळली




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३ बुलढाणा**

बुलढाण्यात ३० प्रवाशांना घेऊन जाणाऱ्या महामंडळाच्या बसचा भीषण अपघात झाला. बसचे ब्रेक फेल झाल्याने बस अनियंत्रित होऊन अपघात झाला. सदर अपघात हा धाड-बुलढाणा मार्गावरील वरुड परिसरात, शरद पवार विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाजवळ घडला आहे. सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नसून चालकाच्या सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, वरुड-सोयगाव-जामठी मार्गावर धावणारी एसटी बस क्रमांक चक २० इङ १८०६ अचानक अनियंत्रित झाली.यावेळेस या बसधून सुमारे ३० प्रवासी प्रवास करत होते. मोठा आवाज झाल्यानंतर ब्रेक पाइप फुटल्याने बसचे ब्रेक निकामी झाल्याचे चालक एन. आर. शिपने यांच्या लक्षात आले.परिस्थिती गंभीर असतानाही चालकाने प्रसंगावधान राखत गिअर बदलून बसचा वेग कमी करण्याचा प्रयत्न केला.


रस्त्याच्या दोन्ही बाजूंना घरे, नागरिक आणि वाहने असल्यामुळे बस वळवणे शक्य नव्हते. अखेर संभाव्य जीवितहानी टाळण्यासाठी चालकाने समोर असलेल्या गजानन माघाडे यांच्या घराजवळील विद्युत पोलच्या ताणाला बस धडकवली. त्यानंतर बस रस्त्याच्या उजव्या बाजूला डोंगरे यांच्या शेतातील कडब्याच्या गंजीवर जाऊन थांबली. या अपघातात बसखाली आलेल्या दुचाकीस्वाराचाही जीव थोडक्यात वाचला. स्थानिक नागरिकांनी तात्काळ धाव घेऊन त्याला सुरक्षित बाहेर काढले. दुचाकीस्वार सुखरूप असल्याचे समजताच सर्वांनी सुटकेचा नि:श्वास सोडला.

घटनेची माहिती मिळताच ठाणेदार प्रताप भोस यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले. केंद्रे साहेब आणि पोलीस कॉन्स्टेबल माळी यांनी पंचनामा करून पुढील कारवाई केली. यावेळी परिसरातील पोलीस पाटील, सरपंच, उपसरपंच तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. चालकाच्या सतर्कतेमुळे आणि नागरिकांच्या मदतीमुळे मोठा अनर्थ टळला असला, तरी वारंवार होणाऱ्या अशा घटनांमुळे एसटीच्या जुन्या व भंगार बसेसचा प्रश्न पुन्हा गंभीर बनला आहे.

## ठाकरे गटाला मोठा हादरा! एकाचवेळी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या ४ उमेदवारांचे अर्ज बाद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३सोलापूर**

सोलापूर जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाला अक्कलकोट तालुक्यात मोठा राजकीय धक्का बसला आहे. छाननी प्रक्रियेदरम्यान ठाकरे गटाच्या तीन जिल्हा परिषद उमेदवार आणि एक पंचायत समिती उमेदवाराचा अर्ज तांत्रिक कारणांमुळे बाद ठरवण्यात आला आहे. या निर्णयामुळे तालुक्यातील राजकीय समीकरणे बदलली असून ठाकरे गटाच्या निवडणूक रणनीतीला खिंडार पडले आहे.



**नेमकी काय आहे स्थिती?**

ठाकरे गटाने अक्कलकोट तालुक्यात पूर्ण ताकदीनिशी उतरण्याचा निर्धार केला होता. तालुक्यातील पाच जिल्हा परिषद गट आणि तीन पंचायत समिती गणांमध्ये त्यांनी उमेदवार उभे केले होते. मात्र, निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या छाननीत खालील ठिकाणचे अर्ज बाद झाले आहेत:

**राजकीय परिणाम आणि चुरस**

अक्कलकोटमध्ये शिवसेना ठाकरे गटाची थेट लढत भाजप (आमदार सचिन कल्याणशेट्टी गट) आणि शिवसेना शिंदे गटाशी होणे अपेक्षित होते. मात्र, महत्त्वाच्या चार जागांवरून ठाकरे गटाचे उमेदवार बाहेर पडल्याने आता या जागांवर तिरंगी किंवा चौरंगी लढतीऐवजी महायुती आणि इतर अपक्ष किंवा छोट्या पक्षांमध्ये सामना होण्याची चिन्हे आहेत.

## राज ठाकरेंची भूमिका ही बाळासाहेब ठाकरेंचीच

### ठाकरे बंधू मराठी माणसांच्याच हिताचा निर्णय घेतील, बाळा नांदगावकर यांचा दावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३ मुंबई**

नसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आगामी काळात राजकारणात लवचिक भूमिका घेण्याचे संकेत दिलेत. या प्रकरणी महाराष्ट्राच्या राजकारणात वेगवेगळे पडसाद उमटत असताना मनसे नेते बाळा नांदगावकर यांनी राज ठाकरे यांनी बाळासाहेबांसारखीच लवचिक भूमिका घेतल्याचा दावा केला आहे. राज ठाकरे यांची भूमिका ही बाळासाहेब ठाकरेंसारखीच आहे. त्यामुळे ठाकरे बंधू आगामी काळात मराठी माणसांच्याच हिताचा निर्णय घेतील, असे ते म्हणालेत.

बाळा नांदगावकर आज पत्रकारांशी बोलताना म्हणाले, बाळासाहेबांना आपला मराठी माणूस जेवढा प्रिय होता, तेवढाच हिंदू माणूसही प्रिय होता. याचा अर्थ त्यांनी इतर धर्मियांचा कधी द्वेष केला नाही. इतर भाषिकांचाही त्यांनी कधी द्वेष केला नाही. त्यांनी सर्वांना सोबत घेऊन आपले आयुष्य पुढे घेऊन गेले. त्यामुळे बाळासाहेबांची शिकवण घेऊनच आपण अत्यंत प्रामाणिकपणे काम केले पाहिजे. पण काहीवेळा परिणामांची पर्वा न करता बाळासाहेब वागत होते. त्यानुसार परिणामांची पर्वा न करता सुद्धा आपल्याला पुढील वाटचाल करावी लागेल. एकजुटीने करावी लागेल. आपण जे करतो ते बाळासाहेबांना पटेल का? असा विचार करून आपण वागले पाहिजे. आम्ही त्यासाठीच आज त्यांना आदरांजली वाहिली.

**राज ठाकरेंच्या लवचिक भूमिकेवर काय म्हणाले?**

राज ठाकरे यांनी आज ठाकरे गटाच्या मुखपत्रात बाळासाहेबांवर एक लेख लिहिला



आहे. तसेच एक पोस्टही केली आहे. या पोस्टद्वारे त्यांनी मराठीच्या मुद्यावर बाळासाहेबांसारखी लवचिक भूमिका घेण्याचे संकेत दिलेत. त्यांच्या या भूमिकेविषयी महाराष्ट्राच्या राजकारणात वेगवेगळ्या प्रतिक्रिया येत आहेत. नांदगावकरांनी यावरही सावध भाष्य केले. ते म्हणाले, त्या - त्या वेळेला त्या - त्या घटना घडल्या. बाळासाहेबांनी मुरली देवरांनाही महापौर बनण्यासाठी मदत केली होती. बाळासाहेब जेवढे कठोर होते, तेवढेच ते वेळप्रसंगी मेणासारखे मऊ व्हायचे.

बाळासाहेबांची भूमिका सदैव आपल्या पक्षाच्या हिताची असत. पण त्याहून पुढे जाऊन ते मराठी माणसांच्या हिताची भूमिका घेत होते. आजही मला वाटते की, जेव्हा बाबरी विषय आला तेव्हा आम्ही कारसेवेला गेलो होतो. त्यावेळी भाजपच्या सर्व लोकांनी हात वर केले होते. पण बाळासाहेबांनी अत्यंत ठाम भूमिका घेतली होती. या घटनेत माझ्या शिवसैनिकाचा हात असेल तर मला त्याचा मला गर्व आहे असे ते म्हणाले होते. त्यावेळी त्यांनी कशाहीची पर्वा केली नव्हती. त्यांनी आपली भूमिका अत्यंत स्पष्ट व परखडपणे मांडली. मराठी माणसांच्या बाबतीत त्यांनी कधीही तडजोड केली नाही.

## ठाकरे बंधू आज पुन्हा एका व्यासपीठावर

### आज बाळासाहेबांची जयंती : मोदी-भाजप-फडणवीसांवर रडण्याचा कार्यक्रम नव्हे - भाजप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३मुंबई**

महापालिका निवडणुकीनंतर आज राज व उद्धव ठाकरे हे पुन्हा एकदा बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त एका व्यासपीठावर येणार आहेत. मनसेने कल्याण डोंबिवलीत शिंदे गटाला दिलेला पाठिंब्याच्या पार्श्वभूमीवर हे दोन्ही बंधू एकत्र येणार असल्यामुळे त्याकडे अवघ्या राज्याचे लक्ष लागले आहे. दरम्यान, भाजपने कुटुंब एकत्र येणे चांगलेच असते असे नमूद करत त्यांना जनतेने का नाकारले याचे उत्तर शोधण्याचा सल्ला दिला आहे.



शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे याच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आज मुंबईतील षण्मुखानंद सभागृहात एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाला मनसे अध्यक्ष राज ठाकरे व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हजर राहणार आहेत. हे दोघे तिथे मार्गदर्शनही करणार आहेत. या पार्श्वभूमीवर भाजप प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी या निमित्ताने ठाकरे बंधूंवर निशाणा साधला आहे.

**४ दिवसांतच ठाकरे बंधूची युती हवेत विरली**

उल्लेखनीय बाब म्हणजे केशव उपाध्ये यांनी मनसेने कल्याण डोंबिवली महापालिकेत शिंदे गटाला दिलेल्या पाठिंब्यावरूनही ठाकरे बंधूंवर निशाणा साधला होता. अजून निकाल लागून जेमतेम चार दिवस झाले. महाराष्ट्राच्या हिताकरता दोन्ही भाऊ एकत्र आल्याच्या उध्दव ठाकरे व संजय राऊत यांच्या गगनभेदी घोषणा हवेत विरण्याआधीच, तिकडे कल्याण डोंबिवली मध्ये मनसेने उबाठाची साथ सोडलीच. उबाठाच्या नगरसेवकांनीही 'जय महाराष्ट्र' केला. पत्त्यातील बंगला सुध्दा यापेक्षा जास्त टिकतो, असे ते म्हणाले होते.

## बदलापुरात शाळकरी मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर, प्रशासनासह शाळांकडून हलगर्जीपणा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २३ ठाणे**

चार वर्षाच्या चिमुकलीवर शाळेच्या व्हॅन चालकाने व्हॅनमध्येच लैंगिक अत्याचार केल्याने बदलापूर पुन्हा एकदा हादरलं आहे, या प्रकरणी बदलापूर पोलिसांनी पॉक्सो कायद्यान्वये तात्काळ कारवाई करत आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत. असं असलं तरी बदलापुरात सातत्याने घडणाऱ्या या घटनांमुळे लहान मुलांच्या, विशेषकरून मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. बदलापूर प्रकरणातील आरोपीला सध्या २७ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली असून या प्रकरणाचा तपास सुरू आहे.

चार वर्षीय शाळकरी मुलीवर शाळेतून परत येत असताना व्हॅन चालकानेच अतिप्रसंग केला. ही घटना समोर येताच बदलापूर पोलिसांनी व्हॅन चालकाला अटक केली. बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण (पॉक्सो) कायद्याअंतर्गत व्हॅन चालकाला अटक करण्यात आली.

**व्हॅन चालकाला अटक**

ज्या व्हॅनमधून ही चिमुकली रोज शाळेत ये जा करायची त्याच व्हॅनच्या चालकाने चिमुकलीवर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला.




मुलगी घरी येताच तिने घरच्यांना घडलेल्या प्रकार सांगितला. ही हकीकत ऐकताच त्यांना देखील धक्काच बसला. पण त्यांनी क्षणाचाही विलंब न करता त्यांनी थेट बदलापूर पोलीस ठाणं गाठलं.

ऑगस्ट २०२४ मध्ये दोन शाळकरी मुलींवर शाळेतीलच अक्षय शिंदे नावाच्या सफाई कर्मचाऱ्याने केलेल्या लैंगिक अत्याचाराच्या घटनेवरुन बदलापूर पेटून उठल होतं. माणुसकीला काळिमा फसणाऱ्या या घटनेनंतर अक्षय शिंदेला एन्काउंटरमध्ये पोलिसांनी मारलं खरं, पण या संपूर्ण घटनेची आठवण आजही बदलापूरवासियांमध्ये ताजी आहे. त्यातच आता पुन्हा एकदा ४ वर्षाच्या चिमुकलीवर व्हॅन चालकाने लैंगिक अत्याचार केल्याने बदलापूर पुन्हा एकदा हादरलं आहे.

**बदलापूरवासियांमध्ये संताप**

ही घटना समोर येताच बदलापूरवासियांनी संताप व्यक्त करत ज्या व्हॅनमध्ये हे कृत्य घडलं तिची तोडफोड केली. व्हॅन चालकाकडे कोणताही परवाना नसल्याने आरटीओ कडून कारवाई देखील करण्यात आली आहे. स्थानिक राजकारण्यांनी महिला आयोग तसेच शिक्षण अधिकाऱ्यांची भेट घेत कठोर कारवाईची मागणी देखील केली.

शाळकरी मुलीवर झालेल्या लैंगिक अत्याचाऱ्याच्या या घटनेमुळे बदलापुरात शाळकरी मुलींना नेमक का लक्ष केल जातंय? प्रशासनासह शाळांकडून कुठे हलगर्जीपणा तर होत नाही ना? या सगळ्यांची चौकशी होणं गरजेचं आहे.

## संपादकीय ......

# भाववाढीची चांदी!

*जागतिक भूराजकीय अस्थिरतेचे धक्के अर्थकारणाला बसणे साहजिक असते आणि ते गृहितही असते. मात्र अमेरिकेच्या, विशेषतः तेथील राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या मनमानी धोरणामुळे ते तीव्रतेने जाणवू लागले असून शेअर बाजार किंवा सोने-चांदी बाजारातील चढउताराचे ते एक मुख्य कारण ठरले आहे. ज्यावेळी जगात युद्धाचे व अस्थिरतेचे ढग पसरू लागतात, तेव्हा शेअर बाजारात घसरगुंडी होत असते. उलट अशा उतरत्या काळात लोक किंवा गुंतवणूकदार सुरक्षितता म्हणून सोने आणि चांदी खरेदी करू लागतात. कारण संकटाच्या वेळी सोन्या-चांदीचा आपल्याला अधिक उपयोग आहे, अशी जनभावना असते. त्यामुळे अमेरिका आणि ग्रीनलँडमधील विषय तापला असताना निर्माण झालेल्या अस्थिरतेमुळे सोने-चांदी तेजीत होती. ग्रीनलँड ताब्यात घेण्यासाठी अमेरिका बळाचा वापर करणार नाही, असे आश्वासन अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दावोस येथील जागतिक आर्थिक परिषदेत दिले. त्यामुळे गुरुवारी लगेचच शेअर बाजारात उत्साह संचारल्याचे दिसून आले. मात्र ग्रीनलँडचे संरक्षण केवळ अमेरिकाच करू शकते, असेही त्यांनी सूचित केले. त्यांचा पवित्रा आक्रमक आहे. म्हणूनच सोने-चांदी बाजारावर या वक्तव्याचा कोणताही परिणाम न होता उलट बाजार वधारला.*

*अमेरिकेचे नवीन विस्तारवादी धोरण आणि त्यामुळे वाढत्या भूराजकीय तणावामुळे मंगळवारी सेन्सेक्स १०६६ अंशांनी कोसळून तो ८२ हजारांखाली गडगडला होता. तो आता सावरताना दिसतो. ही अस्थिरता तूर्त तरी काहीशी निवळत चालली असल्याचा अर्थ त्यातून काढता येतो. त्यापूर्वी अमेरिकेने इराणला धडा शिकवण्याची भाषा केली, तेव्हादेखील सराफ बाजारात तेजीचेच वातावरण होते. गेल्या गुरुवारी सोने दीड लाखापार गेले आणि एकाच दिवसात २२,६६० रुपयांची वाढ झाल्याने चांदी ३ लाख ३० हजारांच्या पार गेली. सोन्याने जीएसटीसह प्रति दहा ग्रॅम १,५५,००० रुपयांची सीमा पार केली. नवीन वर्षात आतापर्यंत चांदीच्या भावात ८७ हजार रुपयांची वाढ झाली. चांदीची चमक दिवसेंदिवस वाढत चालली असून, सिल्व्हर एक्स्चेंज ट्रेडेड फंडानेही उच्चांकी पातळी गाठली. मार्च महिन्यातील चांदीच्या फ्युचर्समध्ये ३ टक्क्यांची वाढ झाली असून, त्याने प्रति किलोग्रॅम ३,१८,७२९ रुपयांचा ऐतिहासिक विक्रम गाठला.*

*अमेरिका आणि युरोपीय युनियनमधील तणाव वाढल्यामुळे चांदीची भरधाव तेजी सुरू आहे. चालू आर्थिक वर्षातील सर्वोत्तम कामगिरी करणारा मौल्यवान धातू म्हणून चांदीने स्थान मिळवले. आंतरराष्ट्रीय बाजारात स्पॉट चांदीने तर ९५ डॉलरची विक्रमी पातळी गाठली. सिल्व्हर ईटीएफ ७ टक्क्यांहून अधिक वाढून प्रति युनिट ३०८.३७ वर पोहोचला. अन्य कंपन्यांचे काही ईटीएफ प्रत्येकी ५ टक्क्यांनी वधारले. जगातील विविध देशांच्या मध्यवर्ती बँका आपापल्या गंगाजळीतील सोन्याचा साठा वाढवत आहेत. त्यामुळे मागच्या तीन आठवड्यांत सोन्याच्या किमतीत २४,२०० रुपयांची वाढ झाली. वर्ल्ड गोल्ड कौन्सिलच्या ताज्या अहवालानुसार, भारतीय रिझर्व्ह बँकेने २०२५ मध्ये केवळ ४.०२ टन सोने खरेदी केले. गेल्या आठ वर्षांचा विचार करता, ते फारच कमी आहे. २०२४ मध्ये रिझर्व्ह बँकेने ७२ टन सोने खरेदी केले होते. या गोष्टीचादेखील बाजारपेठेवर परिणाम होत असतो. रिझर्व्ह बँकेकडे एकूण ८८० टन सोने आहे. नोव्हेंबर २०२५ पर्यंत रिझर्व्ह बँकेच्या परकीय चलनसाठ्यातील सोन्याचे मूल्य १०० अब्ज डॉलर्सपेक्षाही जास्त आहे. भारताच्या एकूण सुवर्णसाठ्यापैकी ५२ टन सोने देशात सुरक्षित आहे. तर ३४८ टन सोने बँक ऑफ इंग्लंड आणि बँक फॉर इंटरनॅशनल सेटलमेंट यांच्याकडे सुरक्षित ठेवण्यात आले आहे. सोन्याच्या किमतीचा विचार करता २०२२ पासून दरात १७५ टक्क्यांची वृद्धी झाली. २०२५ मध्ये सोन्याच्या किमती ६५ टक्क्यांनी वधारल्या. सुरक्षित गुंतवणुकीच्या वाढत्या मागणीमुळे सोन्याचे दर गगनाला भिडले. जागतिकीकरणामुळे विविध घटनांचा वेगवेगळ्या बाजारपेठांवर लगेचच परिणाम होत असतो, हे लक्षात घेतले पाहिजे. दुसरीकडे, भावातील तेजीमुळे सोने तारण ठेवून मोठ्या प्रमाणावर कर्ज उचलले जात आहे.*

*सोने तारण कर्जावरील एनपीएमध्ये २८ टक्क्यांची वाढ झाली असून, येणे कर्जांत २७ टक्क्यांची वाढ झाली आहे. या थकबाकीमध्ये व्यापारी बँकांचा वाटा सिंहाचा आहे. त्यांची ही थकित रक्कम २०४० कोटी रुपये असून, वित्तीय कंपन्यांची थकबाकी ४७८४ कोटी रुपये आहे. भविष्यात असेच घडत राहिल्यास या बँका व कंपन्या संकटात येऊ शकतात. बँकांनी आणि एनबीएफसीजनी ११ लाख कोटी रुपयांवर सोने तारण कर्जे दिली आहेत. रिझर्व्ह बँकेने व्यापारी बँका व एनबीएफसीजनी गोल्ड लोन्सबद्दलची आपली धोरणे व ती देण्याची प्रक्रिया यांचा फेरआढावा घेण्याची सार्थ सूचना केली आहे. याबाबत बाहेरील व्यक्तींची वा कंपन्यांची सल्ला-सेवा घेण्यात येणार असेल, तर त्यावर सोने तारण कर्ज देणार्या बँकेने अथवा एनबीएफसीने नियंत्रण ठेवले पाहिजे, अशी सूचना रिझर्व्ह बँकेने केली आहे.*

*संबंधितांनी या सूचनेचे पालन केले पाहिजे. यापूर्वी अनेक ऋणको ९ ते १२ टक्के व्याज बँकांना देऊन, गहाण ठेवलेले दागदागिने पुन्हा गहाण ठेवत असत. मूळ मुद्दलाची रक्कम न देता येणे कर्जाच्या रकमेत त्यामुळे वाढ होत असे. गेल्या सप्टेंबरमध्ये रिझर्व्ह बँकेने यासंदर्भात बँका व एनबीएफसीजना आदेश दिले. परिणामी आता जर सोने फेरगहाण ठेवायचे असेल, तर ऋणकोंना मुद्दलाची पूर्ण रक्कम आणि व्याज द्यावे लागते. त्यानंतरच कर्जाची मुदत वाढवण्याची विनंती करता येते. तसेच सोने-चांदी किंवा एक्स्चेंज क्रेडिट फंड वा म्युच्युअल फंडांच्या युनिटस्च्या आधारे कोणताही अॅडव्हान्स देण्यास रिझर्व्ह बँकेने मज्जाव केला आहे. तसेच सोन्याच्या किमतीच्या ७५ टक्केपेक्षा जास्त कर्ज देऊ नका, असेही बजावण्यात आले आहे. सोने गहाण ठेवून कर्ज घेण्याची प्रवृत्ती वाढली आहे. याचे कारण म्हणजे ती सहजपणे मिळतात. सोन्या-चांदीच्या भाववाढीमुळे हुरळून जाण्याचे कारण नाही. जगभरात व्यापारयुद्धे व थेट युद्धे सुरू असल्याचाच तो परिपाक आहे.*

# भाजपच्या ‘विजयरथा’ला काँग्रेसचा ‘ब्रेक’



अमरावती महानगरपालिकेच्या २०२६ च्या निवडणूक निकालांनी राज्याच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष वेधून घेतले आहे. २०१७ मध्ये ४५ जागांसह एकहाती सत्ता मिळवणाऱ्या भारतीय जनता पक्षाला यंदा काँग्रेसने कडवी झुंज देत रोखले आहे. हे निकाल केवळ आकड्यांचा खेळ नसून, बदललेली राजकीय समीकरणे आणि रणनीतीचा विजय मानला जात आहे.डॉ. सुनील देशमुख: काँग्रेसचे 'गेमचेंजर' नेतृत्वया निवडणुकीच्या निकालाचा सर्वात मोठा केंद्रबिंदू डॉ. सुनील देशमुख हे राहिले आहेत. २०१७ मध्ये भाजपच्या विजयाचे शिल्पकार राहिलेले डॉ. देशमुख आता काँग्रेसमध्ये परतल्याने चित्रात मोठा बदल झाला. त्यांनी विखुरलेल्या काँग्रेस कार्यकर्त्यांना पुन्हा सक्रिय केले. बबलू शेखावत आणि विलास इंगोले यांच्यासारख्या अनुभवी नेत्यांना विश्वासात घेऊन त्यांनी शहरात काँग्रेसची पकड मजबूत केली. काँग्रेसच्या या यशात केवळ स्थानिक गटबाजी संपवणेच नव्हे, तर वरिष्ठ नेत्यांचा समन्वयही महत्त्वाचा ठरला. माजी मंत्री यशोमती ठाकूर यांचा आक्रमक बाणा आणि खासदार बळवंत वानखडे यांची जनमानसातील प्रतिमा यामुळे काँग्रेसला ग्रामीण भागाशी जोडलेल्या शहरी मतदारांचा मोठा पाठिंबा मिळाला. या एकत्रित ताकदीमुळे भाजपसमोर एक भक्कम पर्याय उभा राहिला.भाजपने ही निवडणूक जिंकण्यासाठी आपली सर्व ताकद पणाला लावली होती. 'साम, दाम, दंड, भेद' या सूत्राचा वापर करूनही भाजपला २०१७ सारखे यश मिळवता आले नाही.अँटी-इन्कम्बन्सी (सत्ताविरोधी लाट): गेल्या पाच-सात वर्षांतील स्थानिक समस्या आणि मतदारांमधील नाराजी दूर करण्यात भाजपला पूर्णतः यश आले नाही. डॉ. सुनील देशमुखांसारखा अभ्यासू नेता विरोधात गेल्याने भाजपची अंतर्गत रणनीती काही अंशी कमकुवत ठरल्याचे दिसून येते.अमरावतीच्या मतदारांनी या निवडणुकीतून एक स्पष्ट संदेश दिला आहे की, केवळ सत्तेचा वापर करून निवडणूक जिंकता येत नाही, तर त्यासाठी स्थानिक प्रश्नांची जाण आणि सर्वसमावेशक नेतृत्व आवश्यक असते. काँग्रेसने केलेली ही 'मोर्चेबंदी' भाजपच्या आक्रमक प्रचारावर भारी पडली.अमरावती महानगरपालिकेचे हे निकाल आगामी विधानसभा निवडणुकांसाठी दिशादर्शक ठरू शकतात. डॉ. सुनील देशमुख यांच्या घरवापसीमुळे काँग्रेसला आलेली उभारी आणि भाजपच्या 'विजयरथा'ला लागलेला लगाम, हे अमरावतीच्या राजकारणातील एका नवीन अध्यायाची सुरुवात आहे.



**नितीन देशमुख**
माजी नगरसेवक, अमरावती.
(९८९००९८७८७)

# करेक्ट कार्यक्रम झाला आमचा




तुम्हाला माहीत आहे, एक तर मी कुणाच्या नादाला लागत नाही आणि जर का कुणी माझ्या नादाला लागला तर मी त्याला सोडत नाही. तुम्हाला माहीत आहे. पिंपरी-चिंचवडात आम्ही काय काय सुधारणा केल्या. पुण्यामधलेसुद्धा रस्ते, पूल, फूटपाथ, डिव्हायडर वगैरे वगैरे आम्हाला तसेच करायचे होते. निधी आम्हाला व्यवस्थित खेचून आणायचा होता आणि व्यवस्थित खर्च करायचा होता. आतापर्यंत जो काही त्या ठिकाणी भ्रष्टाचार झाला होता तो आम्हाला सहन होत नव्हता. गुंडगिरी आम्ही मोडून काढणार होतो. मेट्रो बिट्रो मोफत करणार होतो. एवढं सगळं सांगून सवरूनसुद्धा दोन्ही महानगरपालिकांमध्ये आमचा करेक्ट कार्यक्रम झाला.आमच्या खिशात नसेना का आणा, पण आम्ही चोवीस तास नळाला पाणी देणार होतो. आम्हाला बाजीराव म्हणा असं कधी म्हणालो बाबा? तरी आमचा करेक्ट कार्यक्रम झाला? आमचे काका बिचारे खूप चांगले. त्यांच्या पुण्याईमुळे आम्ही आतापर्यंत सुखी होतो. त्यांना आम्ही तुमचं वय झालंय. तुम्ही आता थांबा म्हणत होतो. त्यांनी ऐकलं नाही. शेवटी आम्ही त्यांचा पक्ष पळविला. आम्हाला आमचा विकास पाहिजे होता.मी शब्दाचा पक्का आहे. देवेंद्रजीबरोबर आम्ही गेलो असलो तरी या स्थानिक निवडणुका आहेत. दोस्तीतली कुस्ती होती ती! आम्ही काही तरी बोललो असेन कमी-जास्त! म्हणून काय आमचा करेक्ट कार्यक्रम करायचा? आमचे होमपीच आहे हे! महाराष्ट्रातील लोक काय म्हणतील? कधी नाही ते काका आमच्यासोबत मैदानात उतरले. आख्खा महाराष्ट्र म्हणत होता, बरे झाले या निमित्ताने काका-पुतणे एक झाले. त्यांना पण तुम्ही उघडे पाडले? चांगलाच निघाला की तुमचा परिंदा! हमारे पंख ही छाट दिए उसने? त्याच्याकडे बघितले तर त्याची दाढी वगळता काहीही भीतीदायक वाटत नव्हते. पण त्याने आमचा करेक्ट कार्यक्रम केला! आमचे स्वप्न त्याने धुळीस मिळविले.आम्हाला पुणे आणि पिंपरी-चिंचवडचे लंडन आणि पॅरिस करायचे होते. आमचे या लढाईत पानिपत नव्हे तर पुणेपत झाले! आता झाले ते झाले! पाच वर्षे आम्ही इकडे फिरकणार नाही. कारण की आता आम्हाला महाराष्ट्राच्या विकासाचा विचार करावा लागेल! हिम्मत ए मर्दा तो मदद ए खुदा! मुद्दई लाख बुरा चाहे तो क्या होता है? वही होता है जो मंजूरे खुदा होता है।

# मुलगा आरोपी असूनही भरत गोगावले मंत्रिपदी कसे? त्यांची चौकशी का नाही? उच्च न्यायालयाचा संताप

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३मुंबई-** पोलिसांनी कॅबिनेटमंत्री भरत गोगावले यांना चौकशीसाठी बोलावले का? आरोपी मुलगा मंत्री असणाऱ्या वडिलांच्या संपर्कात आहे, पण पोलिसांना सापडत नाही. राज्यात कायद्याचे राज्य आहे का? गोगावलेंना चौकशीला बोलवा. मुलगा संपर्कात आहे की नाही, हे ते सांगतील. मुलगा आरोपी असतानाही गोगावले अजून मंत्रिपदावर कसे आहेत, असा संतप्त सवालही न्यायालयाने केला.

महाड नगरपालिका निवडणुकीदरम्यान शिंदेसेनेचे नेते आणि कॅबिनेट मंत्री भरत गोगावले यांचा मुलगा विकास गोगावले आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार)चे नेते माणिकराव जगताप यांचा मुलगा श्रीयांश जगताप आणि पुतण्या महेश जगताप यांच्यात वाद झाला. त्याचे पर्यवसान हाणामारीत झाले. त्यामुळे दोन्ही पक्षांनी एकमेकांविरोधात तक्रार दाखल केली.

या प्रकरणातील आरोपींचा अटकपूर्व जामीन अर्ज सत्र न्यायालयाने फेटाळला. त्यामुळे त्यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. न्या. माधव जामदार यांच्या एकलपीठापुढे याचिकांवर सुनावणी झाली. विकास गोगावलेला अटक केली का? असा प्रश्न न्यायालयाने महाधिवक्ता मिलिंद साठे यांना केला. त्यावर साठे यांनी, त्याला पोलिस शोधत असल्याचे उत्तर दिले. आरोपी सापडला नाही तर एनबीडब्ल्यू जारी करू आणि तरीही हाती लागला नाही तर पुढील कारवाई करू, असे साठे यांनी न्यायालयाला सांगितले.



दरम्यान, भरत गोगावले यांनी आपला मुलगा फरार असल्याचे वृत्त फेटाळले असून, तो आपल्या संपर्कात असल्याची माहिती एका वृत्तवाहिनीला दिल्याची बाब जगताप यांच्या वकिलांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणली. त्यावरून न्यायालयाने संताप आणि राज्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या स्थितीबाबत तीव्र चिंताही व्यक्त करताना एका मंत्र्यांचा मुलगा गुन्हा दाखल होऊन फरार असताना त्या मंत्र्याविरोधात एकही शब्द न बोलण्याइतके सरकार हतबल आहेत का? एका मंत्र्याचा आरोपी मुलगा मंत्र्यांच्या संपर्कात आहे, पण पोलिसांना कसा सापडत नाही, असा सवाल उच्च न्यायालयाने राज्य सरकारला गुरुवारी केला.

### पोलिसांना शरण येण्यास सांगा

न्यायालयाने पहिल्या सत्रात महाधिवक्ता साठे यांना मुख्यमंत्री आणि गोगावले यांच्याकडून सूचना घेण्याचे निर्देश दिले. त्यानंतर साठे यांनी, पोलिस लगेचच विकास गोगावलेशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करतील. भरत गोगावले आपल्या मुलाशी बोलतील, असे स्पष्ट केले.

केवळ संपर्क साधू नका, त्यांना शुक्रवारी सुनावणीपूर्वी पोलिसांना शरण जाण्यास सांगा. अन्यथा आम्ही आदेश देऊ. तुमच्यावर (पोलिसांवर) दबाव असेल, मात्र न्यायालयावर दबाव नाही, अशा शब्दांत न्यायालयाने सुनावले.

न्यायालयाने श्रीयांश जगताप यांना अटकेपासून अंतरिम संरक्षण दिले. ‘राज्यात कायद्याचे राज्य आहे, हे दाखविण्यासाठी आम्ही हा अंतरिम दिलासा देत आहोत,’ असे स्पष्ट करत न्यायालयाने पुढील सुनावणी २३ जानेवारी रोजी ठेवली.

# शेतकऱ्यांनो सावधान! चिया पिकातील ‘ही’ चूक पाडू शकते मोठा फटका वाचा सविस्तर

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक**

औषधी गुणधर्मामुळे बाजारपेठेत मोठी मागणी असलेल्या चिया पिकामध्ये मोहरीची भेसळ शेतकऱ्यांसाठी भविष्यात मोठे आर्थिक नुकसान ठरू शकते. त्यामुळे सध्या फुलोरा अवस्थेत असलेली मोहरीची झाडे तात्काळ नष्ट करून चिया पिकाचे संरक्षण करावे, असा स्पष्ट इशारा वाशिम जिल्हा कृषी विभागाने दिला आहे.




जिल्ह्यात चिया या प्रीमियम पिकाकडे शेतकऱ्यांचा कल वेगाने वाढत आहे. गतवर्षी जिल्ह्यात सुमारे ३ हजार ६०० हेक्टर क्षेत्रावर चियाची लागवड होती.




मात्र, यंदा हे क्षेत्र ६ हजार हेक्टरपेक्षा अधिक झाले असून, मोठ्या प्रमाणावर शेतकरी चिया पिकाची लागवड करत आहेत. अशा परिस्थितीत उत्पादनाचा दर्जा टिकवून ठेवणे अत्यंत महत्त्वाचे ठरत आहे.

**बिया सारख्या असल्याने धोका अधिक**

चिया आणि मोहरी या दोन्ही पिकांच्या बिया आकार व रंगाने काही प्रमाणात सारख्या असल्याने मळणीच्या वेळी मोहरीच्या बिया चियामध्ये मिसळण्याचा धोका अधिक असतो.

एकदा का बिया मिसळल्या, तर नंतर त्या वेगळ्या करणे खर्चिक आणि कष्टाचे ठरते. परिणामी चियाचा दर्जा घसरतो आणि बाजारात अपेक्षित दर मिळत नाही.

**फुलोरा अवस्थेत ओळख सोपी**

सध्या चिया आणि मोहरी ही दोन्ही पिके फुलोरा अवस्थेत असल्याने मोहरी ओळखणे सोपे आहे.

चिया पिकाला निळसर-जांभळ्या रंगाची फुले येतात

तर मोहरीला ठळक पिवळ्या रंगाची फुले लागलेली दिसतात

याशिवाय मोहरीची झाडे अनेकदा आकाराने मोठी व चियापेक्षा उंच वाढलेली आढळतात. त्यामुळे याच टप्प्यावर मोहरीची झाडे मुळासकट उपटून टाकणे सर्वाधिक फायदेशीर ठरते, असे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे.

**विलगीकरण का आवश्यक?**

मोहरीची झाडे वेळेत नष्ट केली नाहीत, तर त्यांना शेंगा येऊन बिया तयार होतात. मळणीच्या वेळी या बिया चियामध्ये मिसळल्यास चियाची गुणवत्ता घसरते.

दर्जेदार चियाला बाजारात प्रीमियम दर मिळतो, मात्र भेसळ झाल्यास दरात मोठी घट होते. त्यामुळे विलगीकरण न केल्यास शेतकऱ्यांना थेट आर्थिक नुकसान सहन करावे लागू शकते.

**शेतकऱ्यांनी काय करावे?**


* चिया शेताची तातडीने पाहणी करावी
* पिवळी फुले असलेली मोहरीची झाडे ओळखून मुळासकट उपटून टाकावीत
* बिया तयार होण्यापूर्वीच विलगीकरण करावे
* यामुळे मळणीनंतरचा शुद्धीकरण खर्च टळतो आणि उत्पादनाचा दर्जा टिकतो

**कृषी विभागाने काय दिला इशारा-** चिया हे प्रीमियम पीक असून त्याचा बाजारभाव पूर्णतः दर्जावर अवलंबून असतो. सध्या मोहरी फुलोरा अवस्थेत असल्याने विलगीकरणासाठी हीच योग्य वेळ आहे. शेतकऱ्यांनी कोणताही विलंब न करता मोहरीची झाडे काढून टाकावीत.

**- अनिसा महाबळे,**
जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, वाशिम.

# ‘फूड नॉईज’ म्हणजे काय?

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक**



सतत अन्नाचा विचार करणे, काय खावे, कधी खावे किंवा अजिबात खाऊ नये अशा द्वंद्वात अडकणे ही अनेकांसाठी एक मूक वेदना असते. केट डॅनियल नावाच्या महिलेने, जिने स्वतःचे ७० किलोहून अधिक वजन कमी केले आहे, या मानसिक अवस्थेला




‘फूड नॉईज’ (अन्नाचा गोंगाट) असे संबोधले आहे. सोशल मीडियावर आपल्या भावना व्यक्त करताना तिने या मानसिक ओझ्याबद्दल आणि त्यातून मिळालेल्या मुक्तीबद्दल सविस्तर माहिती दिली आहे.

**काय आहे हा ‘फूड नॉईज’?**

केट म्हणते, काय खावे, कधी खावे, खाऊ नकोस की खाऊ... हा गोंगाट इतका मोठा असतो की, दिवसभरातील इतर महत्त्वाच्या कामांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी तुमच्या मेंदूत जागाच उरत नाही. हा सततचा मानसिक कोलाहल अत्यंत थकवणारा आणि विचलित करणारा असतो. यामुळे व्यक्तीला दैनंदिन जीवनात प्रचंड अडथळे येतात.

वजन घटवण्याच्या प्रक्रियेत केवळ आहारातील बदल किंवा प्रबळ इच्छाशक्ती पुरेशी नसते, असे केटचे ठाम मत आहे. तिने आता हा ‘फूड नॉईज’ ९९.९९ टक्क्यांनी कमी केला आहे. ती सांगते की, हे सर्व खाद्यपदार्थ वर्ज्य करण्याबद्दल किंवा सतत स्वतःला ‘नाही’ म्हणण्याबद्दल नाही. हे त्यापेक्षा थोडे सखोल आहे. अन्नाशी संबंधित आपल्या मानसिक पद्धती आणि वर्तणूक समजून घेणे महत्त्वाचे आहे.

या मानसिक ओझ्यातून बाहेर पडल्यानंतरचा अनुभव केटसाठी आयुष्य बदलून टाकणारा होता. ती म्हणते, आता मला जो दिलासा मिळतोय, त्यासाठी मी केलेले प्रयत्न दरवर्षी दहा वेळा करायला तयार आहे. आता मला जीवनाबद्दल आणि दैनंदिन कामांबद्दल अतिशय स्पष्टपणे विचार करता येतो. हे माझ्या आयुष्यातील सर्वात मोठे स्वातंत्र्य आहे.

केटच्या कथेवरून हे स्पष्ट होते की, वजन कमी करणे ही केवळ शारीरिक प्रक्रिया नसून ती मानसिक आरोग्याशी निगडीत आहे. कडक डाएट करण्याऐवजी अन्नाशी संबंधित मानसिक संघर्ष समजून घेतल्यास शाश्वत बदल घडून येऊ शकतो. तुम्हीही अशा ‘फूड नॉईज’ने त्रस्त असाल, तर हे चित्र बदलायला हवे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

शुक्रवार दि. २३ जानेवारी २०२६ शहर/ग्रामिण

# चाहूल उन्हाळ्याची ...... प्रथम डिजिटल गावात पाण्याचा ठणठणात

## कोल्हापुरी बंधारातील पाणी गेले वाहून

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३धारणी**

तालुक्यातील उतावली, दिया आणि हरिसाल गावातील बारमाही वाहणार्या सिपना नदीवरील कोल्हापूरी बंधार्याला गेट न लावल्याने पाणी वाहून गेले आहे. परिणामस्वरूप हरिसाल गावात पाण्याचा ठणठणाट आहे. या कोल्हापुरी बंधार्याच्या पायथ्याशी एक सिंचन विहिर पण आहे. मात्र, आजपर्यंत कवडीचाही उपयोग आदिवासी शेतकर्यांना झालेला नाही. देशातील प्रथम डिजिटल ग्राम म्हणून हरिसालची (ता. धारणी) ख्याती देशभर असली तरी सध्या गावात समस्यांचे डोंगर उभे आहेत. सरपंच गैरकारभारापायी बर्खास्त असून पाण्यासाठी ग्रामस्थांची भटकंती सुरू आहे. गावातील गटारी तुडूंब घाण पाण्याने भरलेल्या आहेत. गल्ली-गल्लीत कचरा साचलेला आहे. गावाची शान समजला जाणारा सिपना नदीवर बांधण्यात आलेला कोल्हापुरी बंधारा गेट न लावल्याने चक्क कोरडा पडलेला आहे. बंधार्यात पाणी नाही तर विहिरीत कसे येणार. बंधारा बांधला तेव्हा जवळच्या शेतांना उन्हाळ्यात पिकांसाठी पाणी मिळते, असे सांगून एक खोल विहिर बांधण्यात आली होती. मात्र, १५ वर्ष लोटले तरी विहिरीला वीज कनेक्शन



देण्यात आलेले नसल्याने सिंचनासाठी पाणी मिळालेच नाही. एका माहितीप्रमाणे, बंधार्याच्या देखभाल व दुरुस्तीसाठी दरवर्षी अंदाजपत्रकात पैश्यांची तरतूद असते. मात्र, आजपर्यंत खर्च करण्यात आलेला नाही. फक्त कागदावरच खर्च दाखविला असल्याची शक्यता आहे. सिंचनासाठी असलेली विहीर पण कुचकामी ठरत आहे. पाईललाईन सुद्धा आतापर्यंत भंगारात जमा झालेली आहे. २०१५ मध्ये मुख्यमंत्रीपदावर देवेंद्र फडणवीस विराजमान होताच हरिसाल गावाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डिजिटल ग्राम म्हणून घोषित करुन अनेक आधुनिक व भौतिक सुविधा दिलेल्या होत्या. मात्र, आजच्या स्थितीत आरोग्य, संचार, शिक्षण, ग्रामीण प्रशासन, पिण्याचे पाणी, स्वच्छता आणि गावातील रस्ते व इतर विकास कामांचे तीनतेरा झालेले आहे. दुसरीकडे सिपना नदीतील बंधार्याचे पाणी वाहून पात्र कोरडे पडल्याने पाणीटंचाई जानेवारीतच निर्माण झालेली असून मे महिन्यात काय स्थिती होईल या विषयी कल्पना करणे काही कठीण नाही.


# भाजपा-एमआयएम युतीची चर्चा तथ्यहीन

## नगरसेवक अभय माथने यांचा खुलासा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अचलपूर :-**

अचलपूर नगरपालिकेतील विशेष व स्थायी समिती सभापती आणि सदस्यांच्या अविरोध निवडीनंतर सोशल मीडियावर भाजपा-एमआयएम युती झाल्याच्या चर्चांना उधाण आले होते.

मात्र या चर्चांचा ठाम शब्दांत भाजपचे स्थानिक नेते व नगरसेवक अभय माथने यांनी इन्कार केला आहे तसेच नगराध्यक्ष रूपाली माथने यांनी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नावाने प्रसिद्ध केलेल्या पत्राद्वारे सदर आरोप पूर्णतः खोटे व दिशाभूल करणारे असल्याचा खुलासा केला आहे. नगरपालिकेत अपक्ष गटाने भाजपाला पाठिंबा दिला असून एमआयएमशी कोणतीही युती झालेली नाही व भविष्यातही होणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.नगरपरिषदेत ४१ सदस्य निवडून आल्यानंतर १५ जानेवारी २०२६ रोजी उपाध्यक्षपदाची निवडणूक झाली होती. या



निवडणुकीत नगर विकास आघाडीच्या पाठिंब्याने काँग्रेसच्या खुर्शिदा बानो विजयी झाल्या. त्यानंतर २१ जानेवारी रोजी विशेष व स्थायी समितींच्या निवडी अविरोध पार पडल्या. शहर विकास आघाडीकडून बांधकाम सभापतीपदी दिपाली जवंजाळ, नियोजन सभापतीपदी दर्शना ठाकूर, महिला व बालकल्याण सभापतीपदी दुर्गा सौनपरोते तर उपसभापतीपदी हेमा आसवानी यांची निवड झाली. नगर विकास आघाडीकडून आरोग्य सभापतीपदी शमशेर खान आणि शिक्षण सभापतीपदी एमआयएम च्या रुखसाना इसा निवडून आल्या.या संपूर्ण प्रक्रियेनंतर पसरवण्यात आलेल्या भाजपा-एमआयएम युतीच्या चर्चांना नगरसेवक माथने यांच्या खुलाशामुळे पूर्णविराम मिळाला आहे.

# अमरावती विद्यापीठ संशोधकांना दक्षिण आफ्रिकेचे पेटेन्ट

## संशोधकांचा आंतरराष्ट्रीय स्तरावर बहुमान कुलगुरू डॉ. बारहाते यांच्याकडून अभिनंदन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३अमरावती-** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या तीन संशोधकांनी दक्षिण आफ्रिकेचे पेटेन्ट प्राप्त करुन आंतराष्ट्रीय स्तरावर अमरावती विद्यापीठाचा बहुमान वाढविला आहे. प्रा. डॉ. प्रशांत ठाकरे, डॉ. नीरज घनवटे व संशोधक विद्यार्थीनी पुजा मांडवीय यांनी 'ए किट फॉर रॅपिड डिटेक्शन ऑफ मिनिमम इनहिबीटरी कन्सन्स्ट्रेशन ऑफ ॲन्टीबायोटिक्स अगेन्स्ट सिलेक्टेड बॅक्टेरियल स्पेशिस' या विषयावर संशोधन केले आहे. विशिष्ट जीवाणूंविरुद्ध प्रतिजैविकांची परिणामकारकता तपासण्यासाठी लागणारा वेळ या किटमुळे कमी होणार आहे. एवढेच नाही, तर आरोग्य क्षेत्रात अचूक उपचारांसाठी हे संशोधन अत्यंत मोलाचे ठरणार आहे.



विशेष म्हणजे डॉ. प्रशांत ठाकरे व डॉ. नीरज घनवटे यांचे हे तिसरे पेटेन्ट आहे. कोरोना काळात या संशोधकांनी अमरावती जिल्ह्यात 'मॉलिक्युलर डायग्नोसिस लॅब' स्थापन करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. जवळपास ५ लाखांहून अधिक कोविड चाचण्या करून त्यांनी जिल्ह्याच्या आरोग्य व्यवस्थेला मोठा हातभार लावला आहे. हैदराबाद येथे नुकत्याच पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत सुध्दा त्यांच्या या संशोधनाचे कौतुक करून त्यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या यशाबद्दल कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे तसेच विविध विभागप्रमुखांनी या संशोधक टीमचे अभिनंदन केले आहे. या यशामुळे विद्यापीठाच्या संशोधन कार्याची आता जागतिक स्तरावर दखल घेतली जात असल्याचे देखील सिध्द झाले आहे.

# इतवारा बाजार उड्डाणपूल प्रकरणी उच्च न्यायालयाचा शासन व सार्वजनिक बांधकाम विभागाला सज्जड दम

## डेडलाईन चुकली, अवमान कारवाईचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

,अमरावती शहरातील इतवारा बाजार येथील गेल्या तब्बल आठ वर्षांपासून रखडलेल्या उड्डाणपूलाच्या बांधकामाबाबत मुंबई उच्च न्यायालयाने (नागपूर खंडपीठ) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग (झथऊ) व संबंधित कंत्राटदारांना जोरदार तंबी दिली आहे. माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख यांच्या पुढाकाराने ॲड. शाहू चिखले यांच्यामार्फत दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिकेवर सुनावणी करत न्यायालयाने प्रशासनाच्या संथ आणि निष्काळजी भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.यापूर्वी उच्च न्यायालयाने इतवारा बाजार उड्डाणपूलाचे बांधकाम ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे स्पष्ट आदेश दिले होते. तसेच या मुदतीत काम पूर्ण न झाल्यास 'कोर्टाचा अवमान' अर्थात कंटेम्प्ट ऑफ कोर्टची कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशाराही देण्यात आला होता. मात्र, ही अंतिम डेडलाईन उलटूनही शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग व कंत्राटदार काम पूर्ण करण्यात सपशेल अपयशी ठरल्याचे वास्तव न्यायालयासमोर उघड झाले.या पार्श्वभूमीवर झालेल्या ताज्या सुनावणीत न्यायमूर्ती अनिल एस. किलोर आणि न्यायमूर्ती राज डी. वाकोडे यांनी उड्डाणपूल बांधकामाच्या संथ गतीवर तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली. न्यायालयाने स्पष्ट निर्देश देत ८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत बांधकामाच्या प्रगतीचा सविस्तर अहवाल न्यायालयासमोर सादर करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच कंत्राटदाराने सादर केलेल्या बार चार्टनुसार काम पूर्ण झाले नसल्यास संबंधितांवर न्यायालयीन अवमानाची कारवाई होऊ शकते, असा सज्जड दमही देण्यात आला.न्यायालयाने जारी केलेल्या अधिकृत आदेशानुसार प्रतिवादी क्रमांक २ सार्वजनिक बांधकाम विभागाने ६ ते ८ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक आहे. या प्रतिज्ञापत्रात ५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत पूर्ण करावयाच्या कामाची वस्तुनिष्ठ माहिती असावी. जर बार चार्टनुसार काम अपूर्ण असल्याचे आढळले, तर विलंबाची ठोस कारणे नमूद करणे आवश्यक असून कंत्राटदाराविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली आहे, याचाही तपशील द्यावा, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे.न्यायालयाने बार चार्टला न्यायालयासमोर दिलेली हमी मानल्याने त्यात कोणतेही विचलन झाल्यास ते थेट न्यायालयाच्या अवमानाच्या कक्षेत येईल, असेही न्यायमूर्तींनी ठणकावून सांगितले. या प्रकरणाची पुढील सुनावणी ९ फेब्रुवारी २०२६ रोजी ठेवण्यात आली आहे.दरम्यान, माजी मंत्री डॉ. सुनील देशमुख यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, आता शासन व सार्वजनिक बांधकाम विभाग कोणती भूमिका घेतो आणि न्यायालय त्या भूमिकेवर समाधानी होते की नाही, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.



इतवारा बाजार उड्डाणपूलाच्या रखडलेल्या कामामुळे नागरिकांना होणाऱ्या त्रासाकडे न्यायालयाने गंभीर दखल घेतल्याने प्रशासनावर आता जबाबदारीची मोठी तलवार लटकत आहे.



## अभिनंदन

प्रभाग क्रमांक १२ मधून प्रचंड मतधिक्याने निवडून आलेले भारतीय जनता पक्षाचे नवनिर्वाचित नगरसेवक प्रदिप हिवसे यांचे अभिनंदन करतांना दैनिक विदर्भ प्रजासत्ताक च्या संपदीका डॉ.शुभांगी जोशी व युसीएन न्यूज चे जिल्हा प्रतिनिधी अरुण जोशी

# लोणार सरोवरावर संकटः पाणी २० फूट वाढल

## मंदिर जलमय; हायकोर्टाने अहवाल मागितला

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३बुलढाणा,** जगप्रसिद्ध लोणार सरोवराच्या सतत वाढत असलेल्या पाण्याच्या पातळी आणि त्यामुळे प्राचीन वारसा बुडाल्याची गंभीर दखल घेत उच्च न्यायालयाने या प्रकरणाची स्वतःहून दखल घेतली आहे आणि ती जनहित याचिका म्हणून स्वीकारली आहे.बुधवारी, न्यायमूर्ती अनिल किलोर आणि न्यायमूर्ती राज वाकोडे यांनी या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन अधिवक्ता मोहित खजांची यांची न्यायालयाचे मित्र म्हणून नियुक्ती केली. न्यायालयाने त्यांना पुढील ७ दिवसांत नियमित जनहित याचिका दाखल करण्याचे आदेश दिले जेणेकरून हा नैसर्गिक वारसा वाचवण्यासाठी आवश्यक पावले उचलता येतील. तलावाच्या वाढत्या पाण्याच्या पातळीमुळे, येथे असलेली अनेक प्राचीन महादेव मंदिरे आणि दीपमाळे



पूर्णपणे किंवा अंशतः बुडाली आहेत. पाण्याची पातळी अंदाजे १५ ते २० फूट वाढल्याचे वृत्त आहे. विशेषतः, गर्भगृह आणि कमलजा माता मंदिराचे गर्भगृह पाण्याखाली गेले आहे, ज्यामुळे मूर्तीचा चेहरा जवळजवळ पाण्याखाली गेला आहे. गेल्या ३-४ महिन्यांत पाण्याची पातळी झपाट्याने वाढली आहे. बेसाल्ट खडकांवर उल्कापाताच्या आघातामुळे तयार झालेले लोणार सरोवर हे जगातील दुर्मिळ उल्कापिंडांपैकी एक आहे. सध्या, सरोवराला चार मुख्य स्रोत आणि अनेक झऱ्यांमधून पाणी मिळत आहे, परंतु या वाढीमागील नेमके वैज्ञानिक कारण अस्पष्ट आहे. चिंतेची बाब म्हणजे, या खाऱ्या सरोवरात आता मासे आढळून येत आहेत, ज्यामुळे त्याच्या मूळ जैवविविधतेला मोठा धोका निर्माण होऊ शकतो.

स्थानिक रहिवासी आणि तलावप्रेमींमध्ये वाढत्या असंतोषानंतर, प्रशासनाने कारवाई केली आहे. सरकारी आदेशानुसार, छत्रपती संभाजीनगर भूजल तज्ञ प्रा. अशोक तेजनकर आणि तहसीलदार भूषण पाटील यांनी तलावाची पाहणी केली. वाढत्या पाण्याच्या पातळीची कारणे शोधण्यासाठी लवकरच तलावाचे सविस्तर वैज्ञानिक सर्वेक्षण केले जाईल असे तज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे.

# अमरावतीत प्रथमच १२ लाख बक्षिस रकमेची बुद्धिबळ स्पर्धा

**आंतरराष्ट्रीय मानांकन मिळवण्यासह विद्यमान फिडे रेटिंग वाढवण्याची सुवर्णसंधी**

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२३अमरावती** विदर्भाच्या बुद्धिबळ इतिहासात प्रथमच अमरावती शहरात १२ लाख विक्रमी पुरस्कार रकमेची अखिल भारतीय फिडे मानांकन बुद्धिबळ स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे. अखिल भारतीय १७०० खालील फिडे मानांकन बुद्धिबळ स्पर्धा २३ ते २५ जानेवारी या कालावधीत शुभम मंगलम, दसरा मैदानासमोर, बडनेरा रोड, अमरावती येथे पार पडणार आहे. या स्पर्धेत उत्साहात बुद्धिबळपटू सहभागी होणार आहेत.

तीन दिवस चालणाऱ्या या स्पर्धेत महाराष्ट्रासह देशभरातील नामांकित, उदयोन्मुख तसेच अनरेटेड बुद्धिबळपटू मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. स्पर्धेतील प्रथम पारितोषिक १ लाख ११ हजार रुपयांचे आहे. १५०१ ते १६०० फिडे मानांकन गटासाठी प्रथम बक्षीस ७१००० तसेच १४०१ ते १५०० फिडे मानांकन गटासाठी प्रथम बक्षीस ७१ हजार रु. ठेवण्यात आले आहे. याशिवाय विविध वयोगट, महिला खेळाडू, ज्येष्ठ खेळाडू व विशेष गटांसाठी मिळून एकूण १५१ पेक्षा अधिक आकर्षक बक्षिसांची योजना करण्यात आली असून, सर्व गटांसाठी एकत्रित बक्षीस रक्कम १२ लाख इतकी आहे. ही स्पर्धा फिडे , ऑल इंडिया चेस फेडरेशन , महाराष्ट्र राज्य बुद्धिबळ संघटना व अमरावती चेस



असोसिएशन यांच्या मान्यतेने आयोजित करण्यात येत असून, फिडे मानांकनासाठी पात्र आहे. त्यामुळे नवोदित खेळाडूंना आंतरराष्ट्रीय मानांकन मिळवण्याची तसेच विद्यमान फिडे रेटिंग वाढवण्याची सुवर्णसंधी उपलब्ध होणार आहे. खेळाडू व पालकांच्या सोयीसाठी स्पर्धास्थळीच भोजन व निवासाची व्यवस्था करण्यात आली आहे.अमरावती चेस असोसिएशनचे अध्यक्ष ड. प्रशांत देशपांडे, उपाध्यक्ष प्रतिक घोगरे, सचिव पवन दोडेजा तसेच होनेस्ट स्पोर्ट्स अॅकॅडमीचे इफ्तिकार शेख यांनी विदर्भातील १७०० पेक्षा कमी मानांकन असलेल्या सर्व बुद्धिबळपटूंनी या दुर्मिळ संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे. अशा मोठ्या बक्षीस रकमेच्या स्पर्धा शहरांमध्ये वारंवार होत नसल्याचे त्यांनी नमूद केले.

प्रथमच मोठ्या आयोजनामुळे बुद्धबळपटूंमध्ये चैतन्य गेल्या काही वर्षांत शहरात बुद्धिबळ स्पर्धा आयोजित करण्यात आल्या तरी त्या जिल्हा स्तरापर्यंत मर्यादित होत्या. त्यामुळे स्थानिक बुद्धिबळपटूंना शालेय जिल्हास्तरीय बुद्धिबळ किंवा विभाग, राज्य स्तरापर्यंत खेळण्याची संधी मिळायची. ज्यांची आर्थिक क्षमता चांगली आहे, ते महानगरातील स्पर्धांमध्ये शुल्क भरून तसेच स्वतः राहण्या, खाण्याचा खर्च करून स्पर्धेत सहभागी व्हायचे. मात्र, प्रथमच शहरात अ.भा.फिडे रेटिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्यामुळे स्थानिक बुद्धिबळपटूंमध्ये चैतन्य निर्माण झाले असून त्यांना राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर उत्तम खेळाच्या माध्यमातून आपली ओळख निर्माण करता येणार आहे.

# आजपासून महाविद्यालयीन एकांकिका स्पर्धा; विदर्भामधील १५ संघ सहभागी

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२३अमरावती-** राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागामार्फत उद्या, शुक्रवारी २३ जानेवारीपासून अमरावतीत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या दोन दिवसीय एकांकिका स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. पीडीएमसी छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहात या स्पर्धा होतील. नागपूर विभागातील एकूण १५ महाविद्यालयांचे सादरीकरण याठिकाणी होणार आहे. प्राथमिक फेरीच्या या स्पर्धेत सादरीकरण करणाऱ्या संघांमधून ५ उत्कृष्ट संघांची महाअंतिम फेरीसाठी निवड करण्यात येणार आहे. अशाप्रकारे चारही विभागातून एकूण २० संघ अंतिम टप्प्यात पोहोचणार आहेत. विशेष बाब म्हणजे प्राथमिक फेरी निःशुल्क ठेवण्यात आली असल्याने जास्तीत जास्त नाट्यसंघांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे, मराठी रंगभूमीतील नवोदित कलाकारांना व्यासपीठ देणे, एकांकिका चळवळीला नवसंजीवनी देणे आणि महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचा वारसा अधिक समृद्ध करणे, हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश आहे. नाट्यरसिकांनी, भरभरून प्रतिसाद देण्याचे आवाहन स्पर्धा संयोजक विशाल फाटे आणि मराठी नाट्य परिषदेचे जिल्हाध्यक्षॲड. चंद्रशेखर डोरले डोरले यांनी केले आहे.

### राज्य अजिंक्यपद स्पर्धाही अमरावतीत

प्रौढांच्या नाटकांच्या प्राथमिक फेरीचे आयोजन उत्तमपणे पार पाडल्यानंतर आता त्याच सभागृहात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या दोन दिवसीय एकांकिका स्पर्धा होत आहेत.

# सोलर सक्ती विरोधात शेतकऱ्यांची तहसील कार्यालयावर धडक

## तहसीलदार यांच्या मार्फत मुख्यमंत्री फडणवीस यांना दिले निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३तिवसा** राज्य सरकारने सोलर सक्ती करून शेतकऱ्यांवर अन्याय केला आहे.राज्य सरकारच्या आडमुठे धोरणामुळे तिवसा तालुक्यातील हजारो शेतकरी विजेच्या कनेक्शन पासून वंचित आहे. त्यामुळे जो पर्यंत राज्य सरकार शेतकरी विरोधी सोलर पंप धोरण बदलणार नाही. तो पर्यंत हा लढा सुरूच राहणार असल्याचा यावेळी आंदोलनात भाषण करताना सामाजिक कार्यकर्ते प्रशांत कांबळे यांनी राज्य सरकारला इशारा दिला आहे.

सोलर सक्तीचे धोरण रद्द करून इच्छुकांना सोलर तर इच्छुकांना विजेचे कनेक्शन देण्याचे सुधारित धोरण करण्याच्या मागणीसाठी तिवसा तालुक्यातील शेकडो शेतकऱ्यांनी गुरूवारी आंदोलन केले. पेट्रोल पंप चौक ते तहसील कार्यालयावर यावेळी शेकडोच्या संख्येने शेतकऱ्यांनी धडक दिली. शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून कोरडवाहू शेती ओलीताखाली आणण्यासाठी शेतकऱ्यांनी विहिरी तर केल्या मात्र त्या विहिरीवर विद्युत कनेक्शनच मिळत नाही.राज्य सरकारने नियुक्त



केलेल्या सोलर कंपन्याकडून महागडे सोलर पंप विकत घ्यावे लागते आहे. सोलर पंपामुळे १ एक्कर पेक्षा जास्त शेतीचे ओलीत सुद्धा होत नाही. पाण्याची धार सोलर पंपामुळे मिळत नाही. शिवाय, सोलर नादुरुस्त झाल्यास त्याची दुरुस्त करण्यासाठी संबंधित कंपन्यांचे गाव, तालुका किंवा जिल्हा पातळीवर कोणतेही सेंटर नाही. परिणामी शेतकऱ्यांना नादुरुस्त सोलर दुरुस्तीसाठी कुठे न्यायचे असा प्रश्न पडला आहे.एकट्या तिवसा तालुक्यात हजारो विहिरी पूर्ण झाल्या आहेत. हजारो विहिरी मंजूर होऊन काम सुरू आहे. मात्र त्या शेतकऱ्यांना आता विहिरीवर सोलर पंपाची सक्ती केल्याने विहिर योजनेचा लाभ घ्यायचा की नाही असा पेच शेतकऱ्यांपुढे पडला आहे.त्यामुळे राज्य सरकारने मागेल त्याला सोलर तर मागेल त्याला विद्युत (एजी) कनेक्शन देण्याचे सुधारित धोरण करण्याच्या मागणीसाठी शिरजगाव मोझरी गावातील शेतकऱ्यांनी उठाव घेतला होता. त्याचे रूपांतर जनआंदोलनात झाले असून, गुरुवारी तिवसा तहसील कार्यालयावर धडक देऊन उपविभागीय अधिकारी दादासाहेब दराडे, तहसीलदार डॉ मयूर कळसे, नायब तहसीलदार आशिष नागरे यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देण्यात आले. तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार, राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार, शिवसेना (उबाठा) कार्याध्यक्ष उद्धव ठाकरे, कॉँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि अमरावती जिल्हाधिकारी यांनाही प्रतिलिपी निवेदन पाठवण्यात आले. यावेळी महादेव अंबुलकर, उमेश बनसोड, विजय कुरळकर, गजानन चर्जन , प्रशांत तायवाडे, संजय मार्डीकर, मुरलीधर मदनकर, देवेंद्र घाटोळ, अहमद पठाण, संदीप हगवणे, अनिल वैद्य, संजय वाडीभसमे, मंगेश डेहनकर, कैलास पुरी, रावसाहेब देवघरे, गजानन उमप, सतीश मालधुरे, पुरुषोत्तम मेश्राम, प्रकाश मेश्राम, चंदू हगवणे, प्रशांत शेंडे, भावराव वैद्य, भूषण गाठे, स्वप्नील निस्ताने, विवेक ठाकरे, शरद धसकट, युवक पाचघरे यांच्यासह शेकडो शेतकरी या आंदोलनात सहभागी होते.

# विदर्भातील ३ महापालिका महापौरपदे महिलांसाठी राखीव

## नागपूर, चंद्रपूर, अकोल्यात महिला महापौर

### अमरावतीमध्ये खुल्या प्रवर्गासाठी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती–** राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांचे निकाल नुकतेच जाहीर झाले आहेत. यामध्ये विदर्भातील नागपूर, अकोला, अमरावती आणि चंद्रपूर या चार प्रमुख महानगरपालिकांचा समावेश आहे. यापैकी तीन महानगरपालिकांमध्ये महापौरपदे महिलांसाठी राखीव ठेवण्यात आली आहेत, तर एका ठिकाणी खुल्या प्रवर्गासाठी जागा आहे.

चंद्रपूर महानगरपालिकेत भाजप दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष ठरला आहे. काँग्रेसला महापौरपद मिळवण्यासाठी अजून सात नगरसेवकांची आवश्यकता आहे. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेकडे सहा नगरसेवक असले तरी, काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार आणि खासदार प्रतिभा धानोरकर यांच्यातील मतभेद तीव्र असल्याने येथे राजकीय समीकरणे बदलू शकतात.

अमरावती महानगरपालिकेत कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत मिळालेले नाही. भाजप सर्वाधिक २७ नगरसेवकांसह सर्वात मोठा पक्ष आहे. सत्ता स्थापनेसाठी भाजपला आमदार रवी राणा यांच्या स्वाभिमानी




पक्षाचे (१५ नगरसेवक) किंवा अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे (११ नगरसेवक) समर्थन घ्यावे लागेल.

अकोला महानगरपालिकेत भाजप बहुमताच्या जवळ आहे. त्यांच्याकडे ३८ नगरसेवक असले तरी, बहुमतासाठी त्यांना आणखी तीन नगरसेवकांची गरज आहे. एकनाथ शिंदे गट आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडे प्रत्येकी एक नगरसेवक असल्याने, त्यांचे समर्थन भाजपसाठी महत्त्वाचे ठरू शकते.

अकोल्यात वंचित बहुजन आघाडीकडे पाच, एमआयएमकडे तीन, एक अपक्ष आणि अकोला विकास समितीकडे एक नगरसेवक आहे. दुसरीकडे, काँग्रेसकडे २१, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेकडे ६ आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडे ३ नगरसेवक आहेत. काँग्रेसला महापौरपद मिळवण्यासाठी भाजप वगळता इतर सर्व पक्षांशी जुळवून घ्यावे लागेल, ज्यामुळे सध्या तरी काँग्रेसचा महापौर होणे अवघड दिसत आहे.

महापौरपदाच्या आरक्षणाबाबत, अकोला आणि चंद्रपूर येथील महापौरपदे ओबीसी (इतर मागास वर्ग) महिलांसाठी राखीव आहेत. नागपूरचे महापौरपद खुल्या प्रवर्गातील महिलेसाठी राखीव आहे. तर, अमरावतीचे महापौरपद खुल्या प्रवर्गातील सर्वसाधारण उमेदवारासाठी आहे.

# १० मार्चला दिल्लीत गोमाता रक्षणासाठी कार्यक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३नवी दिल्ली: –** ज्योतिषपीठ शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद यांच्या वादाची व्याप्ती वाढत चालली आहे. १९ वर्षांनी चार पीठांचे शंकराचार्य एकाच व्यासपीठावर येणार आहेत. १० मार्च २०१६ रोजी दिल्लीत गोमाता रक्षणासाठी मोठा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. त्यात गोमाता राष्ट्रमाता अभियानाच्या मंचातून चारही शंकराचार्य एकत्र येण्याची शक्यता आहे. अविमुक्तेश्वरानंद यांना याआधीच २ पीठांनी समर्थन दिले आहे. तिसऱ्या पीठाचे समर्थन मिळाल्यानंतर खरा–खोटा वाद मागे पडणार आहे. पुरी पीठाचे शंकराचार्य निश्चलानंद, अविमुक्तेश्वरानंद नावावर उघड सहमती आतापर्यंत देत नव्हते परंतु २ दिवसांपूर्वी माघ मेळ्यात अविमुक्तेश्वरानंद यांना त्यांनी लाडके म्हटले होते. गोरक्षणासाठी पुरी पीठाचे शंकराचार्य आधीपासून आंदोलन करत आहेत. पुरी पीठाचे शंकराचार्य निश्चलानंद यांनी गाईंच्या रक्षणाचे व्रत घेण्यासाठी आपले सिंहासन आणि छत्र त्यागले आहे. गोरक्षणाच्या विषयावर चारही शंकराचार्यांचे एकत्र येणे म्हणजे अविमुक्तेश्वरानंद यांच्यावर सर्व शंकराचार्यांची मान्यता असून सर्व शंकराचार्यांना आमंत्रणे देण्याची तयारी सुरू आहे. यापूर्वी १९ मे २००७ रोजी, बंगळूरु




येथे रामसेतू संदर्भात एक परिषद आयोजित करण्यात आली होती. ज्यामध्ये चारही पीठांच्या शंकराचार्यांनी एकाच व्यासपीठावर हजेरी लावली होती. शृंगेरी येथे पहिले चतुष्पीठ परिषद १७७९ आयोजित करण्यात आली होती. भूतकाळात गोरक्षणाशी संबंधित अनेक आंदोलने : जर दिल्लीतील हा कार्यक्रम यशस्वी झाला, तर धार्मिक इतिहासात ही तिसरी वेळ असेल जिथं चारही पीठांचे शंकराचार्य एकाच व्यासपीठावर एकत्र दिसतील. हा सनातन परंपरेसाठी ऐतिहासिक क्षण असेल. भूतकाळात गोरक्षणाशी संबंधित अनेक आंदोलने झाली आहेत व स्वामी अविमुक्तेश्वरानंद यांनी या मुद्द्यावर अनेकदा उघडपणे बोलले आहेत.

# एमआयएम नगरसेविका सहर शेख अडचणीत

## पोलिसांनी बजावली नोटीस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३मुंबई–** राज्यात महापालिका निवडणुकीच्या घोषणा झाल्यानंतर राजकीय हालचालींना गती मिळाली आहे. अनेक इच्छुकांनी आपल्या पक्षातून तिकीट न मिळाल्याने दुसऱ्या पक्षात प्रवेश केला, ज्यामध्ये भाजपमध्ये सर्वाधिक इनकमिंग दिसून आले. या काळात



जवळपास सर्व पक्षांनी नव्याने प्रवेश केलेल्या इच्छुकांना निवडणूक तिकीट दिले, ज्यामुळे काही निष्ठावंत नाराज झाले. मुंबई महापालिका निवडणुकीत भाजप–शिवसेना शिंदे गट युतीत मैदानात उतरले, तर शिवसेना ठाकरे गट, मनसे आणि राष्ट्रवादी शरद पवार गटानेही युती केली. यामुळे पक्षातील अनेक इच्छुकांचे पत्ता कापले गेले. यामध्येच सहर शेख यांचे नाव पुढे आले.

राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून तिकीट न मिळाल्यानंतर त्यांनी एमआयएममध्ये प्रवेश केला. मुंब्र्याला आपला बालेकिल्ला मानणारे नेते जितेंद्र आव्हाड यांच्याविरोधात सहर शेखांनी जोरदार मोहिम चालवली. निवडणुकीत सहर शेख विजयी झाली आणि त्यांचा विजय साजरा करत त्यांनी आव्हाड यांच्यावर टीका करणारा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला.यानंतर सहर शेख यांनी मुंब्र्याला हिरवं करायचं आहे असा विवादित विधान केले. या वक्तव्यामुळे पोलिसांनी सहर शेख आणि त्यांचे वडील युनिश शेख यांना नोटीस बजावली आहे. पोलिसांनी या नोटीसमध्ये स्पष्ट केले आहे की अशा वक्तव्यांमुळे समाजात असंतोष निर्माण होऊ शकतो, त्यामुळे असे भाषण किंवा सोशल मीडियावर असे विधान टाळावे. ही नोटीस भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ कलम १६८ अंतर्गत बजावण्यात आली आहे.


# तलाव रोडवर रात्री चोरट्यांचा धुमाकूळ

## अंदाजे ७ ते ८ लाखांची रोकड लंपास

### पोलिसांकडून तपासाला सुरुवात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३बुलढाणा**
शहरातील तलाव रोड परिसरात मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी धाडसी चोरी करत व्यापारी आस्थापनांना लक्ष्य केल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. तलाव रोडवरील पारर्ले शिवांगी बेकर्स आणि ओम शंकर ग्रो मिल या दोन व्यावसायिक आस्थापनांमध्ये अनधिकृत प्रवेश करून चोरट्यांनी अंदाजे ७ ते ८ लाख रुपये रोकड चोरून नेल्याने शहरात एकच खळबळ उडाली आहे.

ही चोरीची घटना २२ जानेवारी रोजी सकाळी व्यवसाय सुरू करण्यासाठी कर्मचारी व मालक घटनास्थळी आल्यानंतर उघडकीस आली. कार्यालयाचे कुलूप उचकटलेले व आतील सामान अस्ताव्यस्त अवस्थेत आढळून आल्यानंतर चोरी झाल्याचे स्पष्ट झाले.




कार्यालयात ठेवलेली मोठी रोकड गायब असल्याचे लक्षात येताच तातडीने पोलीस प्रशासनाला माहिती देण्यात आली. घटनेनंतर तत्काळ सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करण्यात आली असता, चोरी करतानाचे संपूर्ण दृश्य कॅमेऱ्यात स्पष्टपणे कैद झाल्याचे समोर आले आहे. परिसरातील इतर कॅमेरे, संशयित हालचाली तसेच मागील चोरीच्या घटनांचाही पोलीसांकडून तपास केला जात आहे.

घटना सीसीटीव्ही मध्ये कैद फुटेजमध्ये चोरट्यांची हालचाल, प्रवेशाचा मार्ग आणि चोरीची पद्धत दिसून येत असल्याने तपासाला दिशा मिळण्याची शक्यता आहे. माहिती मिळताच शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून परिसराची बारकाईने पाहणी केली आहे.

# तिवसा येथे रतनागिर महाराज पुण्यतिथी महोत्सव आजपासून

## ३० जानेवारी रोजी समारोप

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२३तिवसा** श्री समर्थ रतनागिर महाराज पुण्यतिथीनिमित्त, वैराग्यमूर्ती श्रीसंत गाडगे महाराज व वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यतिथी महोत्सवाचे आयोजन दिनांक २३ जानेवारी ते ३० जानेवारी २०२६ पर्यंत करण्यात आलेले आहे. आज दिनांक २३ जानेवारी शुक्रवार ला सकाळी ५.०० वाजता 'श्री 'चा अभिषेक व तीर्थस्थापना करून या महोत्सवास प्रारंभ होणार आहे.सकाळी ५.३० ला ग्रामस्वच्छता व जनजागृती, ६.१५ ला ध्यान व काकड आरती आणि त्यानंतर ८.०० वाजता श्री समर्थ रतनगिर महाराज मंदिराचा कळस स्थापन करण्यापूर्वी होमपूजा व त्यानंतर मंदिराच्या कळसाचे पूजन केल्यानंतर कळस स्थापना करण्यात येईल. कळस स्थापना झाल्यानंतर हभप कु. अर्चनाताई निंबोकार ह्या आपल्यामधुर वानितून भागवत कथेचा प्रारंभ करतील.या भागवत सप्ताहामध्ये दररोज सकाळी ५.०० ते ७.०० ध्यान व काकड आरती, सकाळी ९.०० ते ११.०० व ३.०० ते ५.०० भागवत कथा, ५.३० ते ७.०० सामुदायिक प्रार्थना व हरिपाठ आणि त्यानंतर रात्री ८.०० ते ११.०० हरिकीर्तन राहील. या आनंदाच्या सोहळ्यात दिनांक २३ जानेवारी ला रात्री ८.०० ते ११.०० माणिकबाबा गुरुदेव सेवा मंडळ यांच्या भजनाचा कार्यक्रम होईल, दिनांक २४ जानेवारी शनिवारला रात्री ८.०० ते ११.०० ला हभप कु. भुमिका रविन्द्र तिरमारे या बाल कीर्तनकाराचे कीर्तन होईल, दिनांक २५ जानेवारी रविवारला हभप श्री देवेंद्रजी काटे महाराज नागपूर यांचे हरिकीर्तन दिनांक २६ जानेवारी सोमवारला हभप श्री शंतनु महाराज धर्माळे तळेगाव शा. पंत, दिनांक २७जानेवारी मंगळवारला हभप श्री गणेश महाराज शिंदे यांचे भारूडाचा कार्यक्रम होईल, दिनांक २८ जानेवारीला दुपारी २.०० ते ५.०० दंत चिकित्सा शिबीर डॉ. स्नेहा देवतारे (चांभारे) यांच्या उपस्थितीत होणार आहे तसेच रात्री ८.०० ते ११.०० हभप ऋषिकेश महाराज मानमोडे तिवसा यांचे हरिकीर्तन, दिनांक २९ जानेवारी गुरुवारला दुपारी १.०० वाजता ग्रंथपूजन व त्यानंतर तिवसा शहरातून शोभायात्रा निघेल, रात्री ८.०० ते ११.०० भागवतकार हभप कु. अर्चनाताई निंबोकार यांचे हरिकीर्तन आणि दिनांक ३० जानेवारी शुक्रवारला काल्याचे कीर्तन हभप कु. अर्चनाताई निंबोकार यांचे होईल. त्यानंतर मान्यवरांचा सत्कार करण्यात येईल व शेवटी काला आणि महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता होईल,

# विद्यार्थी हिताच्या मुद्द्यांना नेहमी सर्वोच्च प्राधान्य देणार– कुलगुरुः

## विद्यार्थी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांशी डॉ. मिलींद बारहाते यांनी साधला संवाद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती–** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठामध्ये झालेल्या विद्यार्थी संघटनांच्या सभेत कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी विद्यार्थी हिताच्या मुद्द्यांना सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल, अशी ग्वाही दिली. विद्यार्थी संघटनांचे पदाधिकारी आणि विद्यापीठ यांच्यात समतोल व समन्वय राखला जावा, या उद्देशाने विद्यापीठाने दुसऱ्यांदा अशी बैठक आयोजित केली होती. गेल्या बैठकीत उपस्थित न राहता आल्यामुळे कुलगुरु या बैठकीला आवर्जून उपस्थित राहिले. एवढेच नव्हे तर विद्यार्थी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांशी त्यांनी अनेक विषयांवर अगदी दिलखुलासपणे चर्चाही केली.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. श्रीकांत जिचकार स्मृती सभागृह येथे ही सभा पार पडली. या सभेला विद्यापीठ परिक्षेत्रांतर्गत येणाऱ्या पाचही जिल्ह्यातील विद्यार्थी संघटनांचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. तर दुसरीकडे विद्यापीठाच्यावतीने कुलगुरु यांच्याशिवाय कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. व्ही.एम. मेटकर व डॉ. अविनाश बोर्डे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. हेमंत देशमुख, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, विद्यार्थी विकास संचालक तथा समितीचे सदस्य सचिव डॉ. राजीव बोरकर, अधिसभा सदस्य डॉ. रितेश खुळसाम, अमोल ठाकरे, प्रा. कैलास चव्हाण, अमोल देशमुख आणि जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनीही या सभेला उपस्थिती दर्शवून मार्गदर्शन केले.या सभेत विद्यार्थी संघटनेच्या प्रतिनिधींनी विद्यार्थ्यांच्या अनेक समस्या



कुलगुरूंसमोर मांडल्या. महाविद्यालयातील गुणवत्तेचा स्तर, तेथे नसलेल्या सोयी–सुविधा, क्रीडांगण, प्रयोगशाळा आदींचा अभाव या बाबीही यावेळी चर्चेला आल्या. पदाधिकाऱ्यांनी यावेळी काही प्रश्नदेखील उपस्थित केले. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी सर्व प्रतिनिधींनी मांडलेल्या समस्या आत्मियतेने ऐकून घेत विद्यार्थी हिताचे निर्णय विद्यापीठ सदैव घेत राहील आणि विद्यार्थ्यांच्या समस्या सोडवण्यास प्रथम प्राध्यान्य दिले जाईल, असे कुलगुरूंनी विद्यार्थी संघटनांना आश्वस्त केले. सदर मांडणीदरम्यान युवा सेनेचे योगेश सोळंके, ऑल इंडिया स्टुडंट फेडरेशनच्या प्रतिक्षा ढोके, एन.एस.यु.आय.चे संकेत साहू, आकाश गेडाम, सचिव अर्पित गौरखेडे, शुभम बांबल, रिपब्लिकन बहुजन विद्यार्थी परिषदेचे ड. आकाश हिवराळे, आदित्य अवचार, विद्यार्थी सेनेचे इम्रान सय्यद, आय. वाय. सी. चे कुणाल जोध, युवा स्वाभिमान पार्टीचे पंकज सुरडकर, साक्षी उमक, अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे निकेत कलाने, अर्जून ठाकरे, तृष्णा चव्हाण यांनी सहभाग घेतला. संचालन, प्रास्ताविक व आभार डॉ. राजीव बोरकर यांनी मानले. विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रवासात विद्यार्थी हा सर्वात महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळेच, आगामी काळात विद्यापीठ प्रशासनाचे सर्व निर्णय हे 'विद्यार्थी केंद्रित' असतील, अशी ग्वाही कुलगुरूंनी दिली आहे. प्रवेश प्रक्रियेतील सुलभता, नियमित वर्ग आणि परीक्षांचे नियोजन हवे.

विशिष्ट कालावधीनंतर पुन्हा करण्यात आले आयोजन विद्यापीठ हे विद्यार्थी केंद्रीत आहे. विद्यार्थ्यांचा विकास हा सर्वोपरी आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या बैठकी वरचेवर घेतल्या जाणार असल्याचेही यावेळी स्पष्ट करण्यात आले. विद्यार्थी संघटनांचे पदाधिकारी आणि विद्यापीठाचे अधिकारी यांच्यातील बंध अधिक घट्ट व्हावे, अधिकाऱ्यांना स्थानिक पातळीवरील वास्तविकता कळावी आदी अनेक बाबी यामुळे साध्य होतील, असे स्वत: कुलगुरुंनी यावेळी स्पष्ट केले. त्यामुळे विशिष्ट कालावधीनंतर अशी बैठक पुन्हा आयोजित केली जाणार आहे.

# अमरावती जिल्हास्तरीय अधिकारी,कर्मचारी क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन

## ३०,३१ जानेवारी व १फेब्रुवारीला एचव्हीपीएमला आयोजन

## अमरावती जिल्हा परिषदच्या ३हजार अधिकारी,कर्मचारी सहभागी होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

जिल्हा परिषद मधिल अधिकारी,कर्मचारी यांना दैनदीन कामातुन थोडी मुक्तता मिळावी म्हणुन अमरावती जिल्हा परिषदने अधिकारी,कर्मचारी यांचा जिल्हास्तरीय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव ३०,३१जानेवारी व १फेब्रुवारीला जग प्रसिध्द श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ अमरावती येथे आयोजित करण्यात आल्या आहे.या महोत्सवात १५संघाचे ३हजार अधिकारी,कर्मचारी सहभागी होणार आहे. या जिल्हास्तरीय अधिकारी, कर्मचारी क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव उद्घाटन सोहळा दिनांक ३० जानेवारी २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता, श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती येथे होईल.तर बक्षीस वितरण सोहळा दिनांक १ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ,




अमरावती येथे होईल.सर्व सांघिक (क्रिकेट वगळता) स्पर्धांचे आयोजन श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती येथे करण्यात आलेले आहे. (दि. ३० जानेवारी २०२६ ला सकाळी ०९.०० वाजता पासून भाग्यपत्रकानुसार सुरु करण्यात येईल.तर कबड्डीचे सर्व सामने हे पारंपारिक पध्दतीने मातीच्या मैदानावर खेळविले जातील.वैयक्तिक स्पर्धांचे आयोजन (दि.३१ जानेवारी २०२६ ला सकाळी ०९.०० वाजता पासून सुरु करण्यात येईल.सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन दि.३० व ३१ जानेवारी २०२६ ला संगीतसुर्य केशवराव भोसले सभागृह, (तचत), परतवाडा रोड, अमरावती येथे सायं. ०५.०० ते रात्री १०.०० या कालावधीत आयोजित करण्यात येत आहेत.दिनांक ३० व ३१ जानेवारी २६ ला सांस्कृतिक कार्यक्रमाचा क्रमानुसार१) अंजनगाव २) चांदूर रेल्वे ३) वरुड ४) धामणगाव ५) तिवसा ६) धारणी ७) दर्यापूर ८) मोर्शी ९) अमरावती १०) चिखलदरा ११) मुख्यालय १२) भातकुली १३) नांदगाव १४) अधिकारी वर्ग १५) अचलपूर १६) चांदूरबाजारदिनांक ३० जानेवारी २०२६ रोजी सांस्कृतिक कार्यक्रम होईल.१) भक्तीगीत / भावगीत / लोकगीत: ४ मिनिटे (फक्त ऑर्केस्ट्रावर) २) सिनेगीत : ४ मिनिटे (फक्त ऑर्केस्ट्रावर युगल गीत महिला/पुरुष, पुरुष/पुरुष, महिला/महिला, एकल)३) कराओके : ४ मिनिटे,४) एकल नृत्य : ४ मिनिटे दिनांक ३१ जानेवारी २०२६ रोजी १) हास्य जत्रा ७ मिनिटे २) समूहनृत्य – ७ मिनिटे होणार आहे. क्रिकेट (दि.२८ जानेवारी २०२६ ला सकाळी ०९.०० वाजता पासून भाग्यपत्रकानुसार सुरु करण्यात येईल.हे सामने श्रीमती नरसम्मा महाविद्यालय,किरण नगर, जूना बायपास रोड, अमरावती येथे होणार अशी माहीती श्रीराम कुलकर्णी सचिव, जि.प. अधिकारी कर्मचारी क्रीडा स्पर्धा तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा) जिल्हा परिषद, अमरावती,क्रीडा संयोजक डॉ.नितिन उंडे यांनी दिली आहे असे क्रीडा महोत्सवाच्या प्रसिध्दी समितीने कळविले आहे.

सांघिक खेळा मध्ये क्रिकेट, खो-खो,कबडडी,व्हॉलीबॉल पासींग,व्हॉलीबॉल स्ट्रोक्स, फुटबॉल,बॅडमिंटन एकेरी, बॅडमिंटन दुहेरी,बॅडमिंटन एकेरी ४५ वर्षावरील, बॅडमिंटन दुहेरी ४५ वर्षावरील,टेबल टेनिस एकेरी,टेबल टेनिस दुहेरी, टेनिक्कॉईट एकेरी, टेनिक्कॉईट दुहेरी,कॅरम एकेरी,कॅरम दुहेरी याचा समावेश आहे.तर वैयक्तिक स्पर्धेत १०० मिटर धावणे,२०० मिटर धावणे,४०० मिटर धावणे, १५०० मिटर धावणे,१०० मिटर धावणे ४५वर्षावरील,१५०० मिटर धावणे ४५ वर्षावरील, रिले रेस ४१००, लांब उडी, उंच उडी,थाळी फेक,गोळा फेक, भाला फेक,स्विमिंग ५०मी,स्विमिंग १०० मी,स्विमिंग ५० मी (४५ वर्षावरील),स्विमिंग १०० मी (४५ वर्षावरील),बुद्धिबळ याचा समावेश आहे.

# ‘आरटीई’ प्रवेशासाठी शाळा नोंदणीस मुदतवाढ

## प्राथमिक शिक्षण संचालक - शरद गोसावी यांची माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

शिक्षण हक्क कायद्या अंतर्गत अर्थातच आरटीई नुसार राज्यातील खासगी शाळांतील २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेश प्रक्रियेतील शाळा नोंदणीस मुदतवाढ देण्यात आली आहे. आता शाळांना २७ जानेवारीपर्यंत आरटीईच्या संकेतस्थळावर नोंदणी करता येणार आहे. प्राथमिक शिक्षण संचालक - शरद गोसावी यांनी याबाबतचे परिपत्रक प्रसिद्ध केले. आरटीईअंतर्गत राज्यातील खासगी शाळांमध्ये २५ टक्के राखीव जागांवर वंचित आणि आर्थिक दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांसाठी प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येते. या विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश दिला जातो. प्रवेशित विद्यार्थ्यांची शुल्क प्रतिपूर्ती राज्य सरकारकडून संबंधित शाळांना केली जाते. त्यामुळे या प्रवेशप्रक्रियेकडे राज्यभरातील पालकांचे लक्ष असते शैक्षणिक वर्ष २०२६ - २०२७ च्या प्रवेश प्रक्रियेसाठी प्राथमिक शिक्षण संचालनालयाने ९ ते १९ जानेवारी या कालावधीत शाळा नोंदणी करण्याच्या सूचना दिल्या होत्या. या पार्श्वभूमीवर, प्राथमिक शिक्षण संचालक - शरद गोसावी यांनी राज्यातील शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी यांना परिपत्रकाद्वारे सूचना दिल्या आहेत. ’आरटीई २५ टक्के प्रवेशासाठी शाळा नोंदणी आणि पडताळणीचे काम प्रक्रिया दिलेल्या मुदतीत १०० टक्के पूर्ण झाले नाही, ही बाब प्रशासकीयदृष्ट्या योग्य नाही. शाळा नोंदणी आणि पडताळणीसाठी २० ते २७ जानेवारीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. या मुदतीत अखत्यारितील शाळांची नोंदणी आणि पडताळणीची प्रक्रिया पूर्ण करावी ’, असे स्पष्ट करण्यात आले आहे.शाळा नोंदणी आणि पडताळणीसाठी २० ते २७ जानेवारी पर्यंत मुदतवाढ संदर्भात जिल्हा परिषद, अमरावती प्राथमिक शिक्षण विभाग अधीनस्थ विस्तार अधिकारी शिक्षण म्हणून कार्यरत संगीता सोनोने यांनी दिली.

# अमरावती-भातकुली मार्गातील रेल्वे फाटक रस्ता बंद

## ग्रामस्थांनी केली चौकशीची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

भातकुली मार्गावर असलेले रेल्वे फाटक क्रमांक ४ जवळील सार्वजनिक रस्ता बंद करण्यात आल्याप्रकरणी प्रशासनाच्या निर्णयप्रक्रियेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले असून, परवानग्या, नियमावली व विभागीय छजउ संदर्भात मोठी विसंगती असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणाचा खुलासा व्हावा, यासाठी समाजसेवक निलेश गजाननराव पानसे यांनी पत्रकार परिषद घेऊन संबंधित कागदपत्रे माध्यमांसमोर सादर केली.



पत्रकार परिषदेत पानसे यांनी सांगितले की, २७ मे २०२४ रोजी दिलेल्या परवानगीत जिल्हाधिकाऱ्यांकडून कोणतीही अट किंवा नियमावली नमूद करण्यात आलेली नाही. मात्र त्यानंतर दिलेल्या आदेशांमध्ये रस्त्याच्या मालकी हक्काबाबत, संबंधित विभागाची चय घेतल्याशिवाय काम सुरू करता येणार नाही, अशी नोंद आढळून येते. या परस्परविरोधी आदेशांमुळे नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.

प्रेस नोटनुसार, रेल्वे विभागाकडून काम सुरू करण्यासंदर्भात बांधकाम विभागाकडे लेखी स्वरूपात ऋण देण्यात आलेली नसताना काम सुरू केल्याचा आरोप करण्यात आला आहे. याबाबत निवासी जिल्हाधिकारी यांच्या उपस्थितीत चर्चा होऊन ’हा रस्ता सामान्य विभागाचा असून छजउ शिवाय पुढील कार्यवाही करू नये, असे स्पष्ट करण्यात आले होते. तरीही प्रत्यक्षात रस्ता बंद करण्यात आल्याचे सांगण्यात आले.या प्रकरणी आंदोलन झाल्यानंतर ६ फेब्रुवारी २०२५ रोजी काम पूर्ण झाल्याचेदाखवण्यात आले, असा दावाही पत्रकार परिषदेत करण्यात आला. दरम्यान, रेल्वे विभागाने बांधकाम विभागाकडे परवानगी मागितली असता ती नाकारण्यात आली, तरीसुद्धा काम सुरू राहिल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे.रस्ता बंद झाल्यामुळे मलकापूर व परिसरातील ग्रामस्थांना मोठा त्रास सहन करावा लागत असून, विकासाच्यानावाखाली नागरिकांच्या हक्कांचा बळी दिला जात असल्याचा आरोप पानसे यांनी केला. या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी तसेच बंद करण्यात आलेला सार्वजनिक रस्ता तात्काळ खुला करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.तसेच, या प्रकरणासंदर्भात तक्रार केल्यानंतर आपल्या किंवा सहकाऱ्यांच्या जीवितास अथवा मालमत्तेस काहीही हानी झाल्यास त्याची जबाबदारी संबंधित प्रशासनावर राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले. याबाबतची संपूर्ण कागदपत्रे जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करण्यात आल्याचे त्यांनी सांगितलेपत्रकार परिषदेला नीलेश पानसे, विजय अटाळकर, कपिल भोकरे, मोहन अब्रुक, सोपान लोहकरे, भूषण अब्रूक उपस्थित होते.

# नागपूर मनपावर १५ वर्षांपासून भाजपची सत्ता

## गंगाधरराव आणि देवेंद्र फडणवीस पिता-पुत्रही राहिले महापौर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३नागपूर**

नागपूर हे राज्याचे उपराजधानीचे शहर असून राज्यातील तिसरे मोठे शहर आहे. ३१ मे १८६४ रोजी नागपूरमध्ये नगरपालिका अस्तित्वात आली. त्यावेळी सुमारे १६ हजार चौ. किमी क्षेत्रफळ असलेल्या नागपूर शहराची लोकसंख्या ८२ हजार होती. २ मार्च १९५१ रोजी या नगरपरिषदेचे महानगरपालिकेत रुपांतर झाले, तेव्हा शहराची लोकसंख्या ४,८२,३०४ होती.

नागपूर महानगरपालिकेवर गेल्या १५ वर्षांपासून भाजपची सत्ता आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली पालिकेच्या निवडणुका होतात. २०१७ च्या निवडणुकीत भाजपने १०६ नगरसेवक निवडून आणले, तर २०२६ मध्ये १०२ नगरसेवक विजयी झाले, ज्यामुळे सलग चौथ्यांदा सत्ता राखण्यात भाजपला यश मिळाले.




नागपूर महानगरपालिकेचे पहिले महापौर होण्याचा मान शेषराव वानखेडे यांना मिळाला. त्यांनी २४ जुलै १९५२ रोजी प्रथम महापौर म्हणून कार्यभार स्वीकारला आणि १४ जानेवारी १९५३ पर्यंत ते या पदावर कार्यरत होते. त्यानंतर ९ जानेवारी १९५४ ते १२ मे १९५५ आणि १२ मे १९५५ ते २४ जानेवारी १९५६ याप्रमाणे त्यांनी सलग दोन वेळा महापौरपद भूषवले.

१९५१ साली नागपूर महापालिका अस्तित्वात आली, तेव्हा ४२ नगरसेवक होते. ७० वर्षांनंतर महापालिकेचे क्षेत्र वाढले आणि नगरसेवकांची संख्या १५६ पर्यंत पोहोचली. २०१७ च्या महानगरपालिका निवडणुकीवेळी चार वॉर्डांचा एक प्रभाग होता, परंतु महाविकास आघाडी सरकारने २०२२ मध्ये फेररचना करताना तीन वॉर्डांचा एक प्रभाग केला.

महापालिकेच्या निर्मितीवेळी एका नगरसेवकास दरमहा ७५ रुपये भत्ता मिळायचा, तर सभेचा भत्ता १० रुपये होता. आता महापालिकेच्या नगरसेवकास महिन्याला २० हजार रुपये मानधन मिळते.

नागपूर महापालिकेत अनेक कुटुंबातील सदस्यांनी महापौरपद भूषवले आहे. शेषराव वानखेडे हे पहिले महापौर होते, तर त्यांची कन्या कुंदाताई विजयकर यांना पहिल्या महिला महापौर होण्याचा मान मिळाला. कुंदाताईंनी ५ फेब्रुवारी १९९६ ते ९ फेब्रुवारी १९९९ पर्यंत महापौर म्हणून कार्यभार सांभाळला.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि त्यांचे वडील गंगाधरराव फडणवीस हे दोघेही नागपूरचे महापौर राहिले आहेत. गंगाधरराव फडणवीस १४ फेब्रुवारी १९७५ ते ७ मार्च १९७६ या कालावधीत महापौर होते. देवेंद्र फडणवीस यांनी ५ मार्च १९९७ ते ६ फेब्रुवारी १९९८ आणि ७ फेब्रुवारी १९९८ ते ४ फेब्रुवारी १९९९ असे दोनदा महापौरपद भूषवले.

# तापी-नर्मदा परिक्रमा यात्रेचे धारणी येथे उत्स्फूर्त स्वागत



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३धारणी**

श्री गुरुदेव सेवा मंडळ, धारणी व श्री संताजी बहुउद्देशीय शिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने माँ तापी-नर्मदा परिक्रमा यात्रेचे धारणी येथे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले यानिमित्त राष्ट्रसंत तुकडोजी महाराज प्रणित विश्वशांतीसाठी सामुदायिक प्रार्थना व भजनसंध्येचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे आयोजन गुरुदेव सेवा मंडळाचे ग्रामसेवाधिकारी सुभाष येणोरकर, राजेंद्र मावस्कर, प्राध्यापक किशोर श्रीखंडे, प्राचार्या वंदना येणोरकर, मयूर येणोरकर त पंकज येणोरकर यांच्या पुढाकारातून करण्यात आले, यात्रेकरूचे स्वागत करून त्याव्यासाठी फराळ व अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली. सामुदायिक प्रार्थना भजनसंध्येत मयूर येणोरकर व पंकज येणोरकर यांनी भक्तीपूर्ण भजने सादर केली.कार्यक्रमाला ललित जोशी, अशोक भागवत, दिनेश बनसोड यांच्यासहतापी-नर्मदा परिक्रमेतील सुमारे ६० ते ७० यात्रेकरू उपस्थित होते. यात्रेकरूंमध्ये व आध्यात्मिक भक्तीभावाचे संस्कृती संवर्धन सुंदर दर्शन घडले.यावेळी गुरुदेव सेवा मंडळाचे सुभाष येणोरकर व ललित जोशी यांनी विचारमंथन करत भारतीय संस्कृती, आध्यात्मिक परंपरा व अशा यात्रांचे महत्त्व विशद केले. शेवटी सर्व यात्रेकरूंचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले. या स्वागतसमारंभामुळे धारणी शहरात भक्तीपूर्ण वातावरण निर्माण झाले होते.

# आझाद हिंद केसरी शंकरपटात धावल्या ४७८ बैलजोड्या

## बहिरम येथे शकरपट पाहण्यासाठी नागरिकांची एकच गर्दी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३शिरसगाव कसबा**

बहीरम यात्रेतील बहुचर्चीत हिंद केसरी शंकरपटाचा अंतीम दिवस अतीशय उत्साह व प्रचंड गर्दीत रोमांचकारी वातावरणात पार पडला. यावर्षी या शंकरपटात आजपर्यंतचा सर्वच बाबतीत उच्चांक गाठणारा रोमहर्षक अनुभवाने हाशंकरपट पार पडला आजपर्यंतचे सर्वच विक्रम मोडणाऱ्या या शंकरपटामधे एकंदर ४७८ बैलगाड्यांनी सहभाग घेऊन उच्चांक गाठलाशंकरपटाचे आयोजक आ प्रविण तायडे याच्या प्रयत्नाने पार पडलेल्या या शंकरपटातील विजयी बैलजोडी मालक व त्यांच्या धुरकऱ्यांना जाहीर केल्यानुसारबक्षिस वितरण करण्यात आले. जनरल गटातील प्रथम क्रमांक राज विनोद दमये वहाता तिवसा यांच्या जोडीला मिळाला, यामधे बुलेट बटालीयन, तर दुसरा क्रमांक नितू तिवारी यवतमाळ याना होड़ा युनीकॉर्न, तर तृतीय क्रमांक मिशू अन्तिका राठोड यांना ८१ हजार रुपयाचे रोख बक्षिस देण्यात आले. ब गटातील विजेत्यांना ओंकार खोडकर आंबेवाडी यांना प्रथम क्रमांकाचे बक्षीस हीरो होंडा डोलक्स तर द्वितीय क्रमांकाचे बक्षीस आतिशसेठ वर्मा वाशिम यांना ५१ हजाराचे तर तृतीय क्रमांकविशाल राजपुत कपातवाडी यांना ३५ हजाराचे रोख बक्षिस मान्यवर पाहुण्यांच्याहस्ते देण्यात आले. याप्रसंगी आ. प्रविण तायडे यांनी उपस्थित बैलगाडीमालक व त्यांचे धुरकरी यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. या पारितोषिक वितरणाच्या कार्यक्रमाला भाजपाचे गजू कोल्हे, प्रविण तोडगावकर, शंकर मालठाने, रमेश महघे, रूपेश ढेपे, रीतेश नवले, अतुल वाट, बाळासाहेब सोनार, मुरली माकोडे, कुंदन यादव, रमेश तायवाडे, हर्षद धुळे व भाजपा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केवायसीचा फटका! अमरावतीत ६१ हजार ‘लाडक्या बहिणींचे’ अनुदान बंद - साध्या कागदावर प्रतिज्ञापत्र देण्याची नामुष्की

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत मिळणाऱ्या १५०० रुपयांच्या मासिक अनुदानावर केवायसी प्रक्रियेचा मोठा फटका बसला असून अमरावती जिल्ह्यात तब्बल ६१ हजार लाभार्थी महिलांचे अनुदान अचानक थांबवण्यात आले आहे. केवायसीतील तांत्रिक अडचणी, माहितीतील त्रुटी आणि प्रणालीतील दोष यामुळे ही परिस्थिती निर्माण झाल्याने जिल्हाभरात संतापाचे वातावरण पसरले आहे. अनुदान बंद होताच अनेक ठिकाणी महिलांची ओरड सुरू झाली असून प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.शासनाने योजनेत पारदर्शकता आणण्यासाठी केवायसी सक्तीची केली. लाभार्थी महिलांनी केवायसी पूर्ण केली असतानाही, आधार क्रमांकातील चूक, बँक खात्याशी लिंक न होणे, नावातील तफावत, तांत्रिक गडबड अशा कारणांमुळे हजारो महिलांचे अनुदान थेट बंद झाले. विशेष म्हणजे ही चूक लाभार्थी




महिलांची नसतानाही त्याचा फटका त्यांनाच बसल्याने ‘लाडकी बहीण’ योजना वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे.या गोंधळावर तात्पुरता तोडगा काढण्यासाठी प्रशासनाने आता नवी पर्यायी प्रक्रिया लागू केली आहे. केवायसीतील त्रुटीमुळे ज्यांचे अनुदान थांबले आहे, अशा लाभार्थींना साध्या कागदावर स्वघोषित प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. हे प्रतिज्ञापत्र संबंधित अंगणवाडी सेविकांकडे किंवा तालुकास्तरावरील एकात्मिक बालविकास प्रकल्प कार्यालयात जमा करावे लागणार आहे. या प्रक्रियेसाठी जिल्हाभरात अर्ज स्वीकारण्याचे काम सुरू झाले आहे.दरम्यान, प्रशासनाने स्पष्ट केले आहे की सादर करण्यात येणाऱ्या प्रतिज्ञापत्राची उलट तपासणी केली जाणार आहे. तपासणीत माहिती चुकीची किंवा खोटी आढळल्यास संबंधित लाभार्थीवर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. त्यामुळे महिलांनी प्रतिज्ञापत्र भरताना अत्यंत काळजी घ्यावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.प्रशासनाकडून केवायसीतील त्रुटी तातडीने दुरुस्त करण्याचे काम सुरू असून पात्र लाभार्थी महिलांचा सुधारित अहवाल शासनाकडे पाठवण्यात येत आहे. ही प्रक्रिया पूर्ण होताच थांबलेले अनुदान पुन्हा सुरू करण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले आहे. मात्र तोपर्यंत हजारो महिलांना आर्थिक विवंचनेला सामोरे जावे लागत असून, शासनाच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

# महापुरुषांच्या कार्यातुन बालकांनी प्रेरणा घ्यावी

## अमित मोडक यांचे प्रतिपादन, बालगृहाला दिली सदिच्छा भेट



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३दर्यापूर**

महापुरुषांनी मोठ्या कष्टाने स्वतःच्या जीवनासोबतच इतरांच्या जीवनाचेही सोने केले आहे. त्यामुळे तारुण्यात प्रदार्पण करणाऱ्या प्रत्येकाने अशा महापुरुषांच्या जीवनातून प्रेरणा घेवून यशस्वी व्यक्तिमत्व घडवावे, असे आवाहन अमित मोडक यांनी येथे केले.राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्ताने आयोजीत गृह संपर्क अभियानांतर्गत अमितमोडक व त्यांच्या सहकाऱ्यांनी येथील संत गाडगेबाबा बालगृहाला भेट देवून पाहणी केली. तसेचचिमुकल्यांशी संवादही साधला. बालगृहाचे गजानन देशमुख यांनी कार्याची माहिती उपस्थितांना दिली. याप्रसंगी कमलेश भट्ट, परिमल नळकांडे यांचीही उपस्थिती होती. सर्वांनी बालगृहाच्या व्यवस्थे बाबत समाधान व्यक्त करित गजानन देशमुख यांचे सुरु असलेल्या कार्याबाबत मुक्तकंठाने प्रशंसा केली. तसेच बालगृहाला समाज सेवकांचे माध्यमातुन मदत करण्याचे आश्वासन सुध्दा दिले.

# इलेक्शन ड्यूटीला दांडी; गैरहजर कर्मचाऱ्यांवर कारवाईचा बडगा

## वेतन कपात व गुन्हा दाखल होण्याचा इशारा

अरुण जोशी

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२३अमरावती



महानगरपालिका प्रशासनातर्फे पार पडलेल्या निवडणूक प्रक्रियेदरम्यान नियुक्त करण्यात आलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कर्तव्यात कसूर करत निवडणूक ड्यूटीला दांडी मारल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. निवडणूक कर्तव्य बजावण्यास गैरहजर राहिलेल्या अशा कर्मचाऱ्यांविरोधात आता प्रशासन कठोर कारवाईच्या तयारीत असून संबंधितांना कारणे दाखवा नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. नोटिसीला दिलेले उत्तर समाधानकारक न ठरल्यास वेतन कपातीसह फौजदारी कारवाईही केली जाईल, असा स्पष्ट इशारा प्रशासनाने दिला आहे.महापालिका निवडणुकीसाठी विविध विभागांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती. निवडणूक प्रक्रिया सुरळीत व पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी प्रशासनाने वेळोवेळी सूचना देऊनही काही कर्मचारी ठरलेल्या दिवशी आणि वेळेत ड्यूटीवर हजर राहिले नाहीत. प्राथमिक चौकशीत मोठ्या संख्येने कर्मचारी अनुपस्थित राहिल्याचे निष्पन्न झाले असून, यामुळे निवडणूक यंत्रणेवर अतिरिक्त ताण निर्माण झाला होता.या पार्श्वभूमीवर प्रशासनाने गैरहजर कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटिसा बजावण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. नोटिसीद्वारे कर्मचाऱ्यांना गैरहजेरीमागील कारणे लेखी स्वरूपात सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मात्र, या कारणांची काटेकोर तपासणी केली जाणार असून केवळ तोंडी किंवा अप्रामाणिक कारणे ग्राह्य धरली जाणार नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.गैरहजर कर्मचाऱ्यांनी दिलेल्या प्राथमिक कारणांमध्ये आई, पत्नी किंवा कुटुंबातील सदस्य आजारी असल्याची कारणे नमूद केली आहेत. मात्र या कारणांना वैद्यकीय प्रमाणपत्रे किंवा अधिकृत कागदपत्रांची जोड नसल्यास ती कारणे अमान्य ठरवली जाणार असल्याचेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. बनावट किंवा दिशाभूल करणारी माहिती दिल्यास संबंधित कर्मचाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई होण्याची शक्यता नाकारता येत नाही.प्रशासनाने ठामपणे सांगितले आहे की, निवडणूक प्रक्रिया ही प्रत्येक शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्याची संविधानिक व कायदेशीर जबाबदारी आहे. या जबाबदारीपासून पळ काढणाऱ्यांना कोणतीही सवलत दिली जाणार नाही. निवडणूक कायद्यानुसार निवडणूक कर्तव्यात कसूर करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर वेतन कपात, शिस्तभंगाची कारवाई तसेच गुन्हा दाखल करण्याची तरतूद आहे.लोकशाहीचा पाया असलेल्या निवडणुका पारदर्शक आणि शांततेत पार पडाव्यात, यासाठी प्रशासन व कर्मचाऱ्यांचे सहकार्य अत्यंत आवश्यक असते. मात्र काही कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे संपूर्ण यंत्रणेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत असल्याचे प्रशासनाने नमूद केले आहे. त्यामुळे भविष्यात अशा प्रकारची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी कठोर भूमिका घेतली जाईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

# पहाटेच धडक! मौजा वडदमध्ये अवैध मुरूम माफियांवर तहसीलचा घाव - जेसीबी व ट्रक जप्त, महसूल प्रशासन आक्रमक

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२३अमरावती



अमरावती तहसील अंतर्गत येणाऱ्या मौजा वडद परिसरात अवैध मुरूम उत्खनन करणाऱ्या माफियांवर अमरावती तहसील कार्यालयाने पहाटेच जोरदार धडक दिली. अंधाराचा फायदा घेत बेकायदेशीर गौणखनिज (मुरूम) उत्खनन व वाहतूक सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळताच महसूल प्रशासनाने कोणतीही तडजोड न करता थेट कारवाई करत अवैध उत्खनन करणाऱ्यांची झोप उडवली. या धडक कारवाईत एक जेसीबी मशीन आणि ट्रक जप्त करण्यात आला असून परिसरात खळबळ उडाली आहे.तहसीलदार विजय लोखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई राबविण्यात आली. कारवाईसाठी महसूल यंत्रणा पहाटेच सज्ज झाली होती. मंडळ अधिकारी यशवंत चतुर, अभिजित देशमुख, गजानन हिवसे, ग्राम महसूल अधिकारी गोपाल लांजेवार, मेजर वानखडे, महसूल सहायक रामानंद सरस्वती तसेच नायब तहसीलदार टीना चव्हाण यांचा या मोहिमेत सक्रिय सहभाग होता. प्रशासनाच्या पथकाने अचानक धाड टाकत उत्खननस्थळी सुरू असलेला बेकायदेशीर मुरूम उपसा उघडकीस आणला. कारवाईदरम्यान गउइ मशीनच्या सहाय्याने मोठ्या प्रमाणात मुरूम उत्खनन सुरू असल्याचे आढळून आले. त्यानंतर वाहतुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या ट्रकची तपासणी करण्यात आली. मात्र वाहनचालकांकडे कोणतेही वैध परवाने, रॉयल्टी पावत्या किंवा वाहतूक पास नसल्याचे स्पष्ट झाले. नियमांची पायमल्ली करत महसूल बुडविण्याचा हा प्रकार उघडकीस येताच प्रशासनाने तात्काळ कठोर पावले उचलली. संबंधित गउइ मशीन व ट्रक जप्त करून पुढील कायदेशीर कारवाईसाठी तहसील कार्यालयाच्या ताब्यात देण्यात आले आहेत.अवैध मुरूम उत्खननामुळे पर्यावरणाचे गंभीर नुकसान होत असून नदीपात्रे, शेतजमिनी व नैसर्गिक संसाधनांचा ऱ्हास होत आहे. या पार्श्वभूमीवर महसूल प्रशासनाने आक्रमक भूमिका घेतली असून भविष्यात अशा बेकायदेशीर उत्खनन व वाहतुकीविरोधात आणखी कठोर आणि सातत्यपूर्ण कारवाया केल्या जातील, असा स्पष्ट इशारा तहसीलदार विजय लोखंडे यांनी दिला आहे. कायद्याच्या चौकटीबाहेर जाऊन कोणालाही नैसर्गिक संपत्ती लुटू दिली जाणार नाही. अवैध उत्खनन करणाऱ्यांवर कठोर कारवाई अटळ आहे, असेही त्यांनी ठामपणे सांगितले.या पहाटेच्या कारवाईमुळे अवैध मुरूम व्यवसाय करणाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून महसूल प्रशासनाच्या या आक्रमक भूमिकेचे नागरिकांकडून स्वागत केले जात आहे.

# बसपाचे नगरसेवक संपर्कात नसून अफवा पसरवल्या जात आहेत - प्रदेशाध्यक्ष ॲड. डोंगरे यांचा ठाम खुलासा

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२३अमरावती

अमरावती महानगरपालिकेच्या निवडणुकीनंतर बहुजन समाज पक्षाचे निर्वाचित तीनही नगरसेवक इतर पक्षांच्या संपर्कात असल्याच्या वावड्या सध्या पसरवल्या जात आहेत. मात्र या वावड्यांना कोणताही तथ्याधार नसून त्या पूर्णतः खोट्या, दिशाभूल करणाऱ्या आणि जाणीवपूर्वक पसरवण्यात येत असल्याचा ठाम आरोप बहुजन समाज पक्षाचे प्रदेशाध्यक्ष ॲड. डोंगरे यांनी केला आहे. बसपा पक्षाचा सध्या कोणत्याही राजकीय पक्षाशी थेट किंवा अप्रत्यक्ष संबंध नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.ॲड. डोंगरे म्हणाले की, बहुजन समाज पक्ष हा महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर चालणारा पक्ष आहे. भारतीय संविधान, लोकशाही मूल्ये आणि धर्मनिरपेक्षता यावर ठाम विश्वास ठेवणारा बसपा हा कट्टर सेक्युलर पक्ष असून सामाजिक न्याय, समता, बंधुता आणि सर्वसमावेशक विकास हीच पक्षाची मूलभूत भूमिका आहे. जातीयवादी, विभाजनकारी आणि समाजात तेढ निर्माण करणाऱ्या शक्तींना रोखणे हेच बसपाचे पहिले प्राधान्य असल्याचे त्यांनी ठासून सांगितले.महानगरपालिकेतील सत्तास्थापनेबाबत बोलताना ॲड. डोंगरे यांनी स्पष्ट भूमिका मांडली. महापालिकेत जर सेक्युलर आणि संविधाननिष्ठ विचारसरणीचे सरकार स्थापन होत असेल, तर बसपा त्याला प्राधान्य देईल. मात्र कोणत्याही पक्षाच्या दबावाला, अपप्रचाराला किंवा अफवांना बळी पडून बसपा निर्णय घेणार नाही, असेही त्यांनी ठामपणे सांगितले. बसपाला जो पक्ष सन्मानजनक, सत्य आणि न्याय्य स्थान देईल, त्याच्याशीच चर्चा आणि पाठिंब्याचा विचार केला जाईल, हे धोरण स्पष्ट असल्याचे त्यांनी नमूद केले.बसपाचे नगरसेवक संपर्कात असल्याच्या अफवा पसरवून पक्षाची प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप करत ॲड. डोंगरे यांनी अशा प्रकारच्या राजकीय खेळींचा निषेध केला. बसपाचे सर्व नगरसेवक पक्षाशी एकनिष्ठ असून ते पक्षाच्या विचारधारेनुसारच निर्णय घेतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.या स्पष्टोक्तीमुळे बसपाच्या भूमिकेवर पडलेले संभ्रमाचे ढग दूर झाले असून, राजकीय वर्तुळात पसरलेल्या अफवांना पूर्णविराम मिळण्याची शक्यता आहे.

# अमरावती 'लोकल बॉडी' विधानपरिषद निवडणुकीची तयारी वेगात

## जुलैमध्ये मतदानाची शक्यता, जिल्हा परिषद आरक्षणाचा अडथळा कायम

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२३अमरावती



अमरावती जिल्हा स्थानिक स्वराज्य संस्था विधानपरिषदेची निवडणूक येत्या जुलै महिन्यात होण्याची दाट शक्यता असून त्यादृष्टीने प्रशासनाने प्राथमिक तयारी सुरू केली आहे. जिल्हा परिषदेची निवडणूक प्रक्रिया पूर्ण होताच विधानपरिषद निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला जाईल, अशी माहिती प्रशासनातील सूत्रांकडून मिळत आहे. मात्र, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्याने या विधानपरिषद निवडणुकीवरही अनिश्चिततेचे सावट कायम आहे.अमरावती जिल्हा परिषदेच्या आरक्षणाचा प्रश्न अद्याप निकाली न निघाल्याने जिल्हा परिषदेची निवडणूक लांबणीवर पडली आहे. आरक्षणासंदर्भातील कायदेशीर व प्रशासकीय अडचणी दूर न झाल्यास ही निवडणूक थेट नव्या वर्षात घेतली जाईल, असे संकेत देण्यात येत आहेत. परिणामी, स्थानिक स्वराज्य संस्था विधानपरिषद निवडणुकीची प्रक्रिया देखील अप्रत्यक्षपणे प्रभावित होत असल्याचे चित्र आहे.विशेष म्हणजे अमरावती जिल्हा स्थानिक स्वराज्य संस्था विधानपरिषदेच्या विद्यमान सदस्याचा कार्यकाळ जून २०२४ मध्येच संपुष्टात आला आहे. माजी मंत्री व भाजपचे नेते प्रवीण पोटे पाटील हे सलग दोन वेळा या मतदारसंघातून निवडून आले होते. मात्र, कार्यकाळ संपल्यानंतरही नव्या निवडणुकीस विलंब होत असल्याने राजकीय चर्चांना उधाण आले आहे. लोकशाही प्रक्रियेत निर्माण झालेली ही पोकळी लवकर भरली जावी, अशी मागणी विविध स्तरांतून होत आहे.या निवडणुकीत मतदार म्हणून अमरावती महापालिकेचे नगरसेवक, नगरपरिषद सदस्य, नगरपंचायत समितीचे सभापती तसेच जिल्हा परिषदेचे सदस्य मतदान करतात. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांतील सध्याची राजकीय स्थिती या विधानपरिषद निवडणुकीत निर्णायक ठरणार आहे. नुकत्याच पार पडलेल्या नगरपरिषद व नगरपंचायत समित्यांच्या निवडणुकांत संमिश्र निकाल लागला असून, कोणत्याही एका पक्षाला स्पष्ट वर्चस्व मिळालेले नाही. यामुळे 'लोकल बॉडी'चे राजकीय समीकरण झपाट्याने बदलत असल्याचे चित्र आहे.राजकीय तज्ज्ञांच्या मते, अमरावती स्थानिक स्वराज्य संस्था विधानपरिषदेची निवडणूक यावेळी अत्यंत चुरशीची होण्याची शक्यता आहे. बदलते पक्षीय समीकरण, अपक्षांची भूमिका, स्थानिक पातळीवरील आघाड्या आणि रणनीती यामुळे ही निवडणूक कोणते वळण घेणार, हे येणारा काळच ठरवेल. विशेषतः महापालिका, नगरपरिषद आणि जिल्हा परिषद स्तरावरील सत्ता-समीकरणे या निवडणुकीत महत्त्वाची भूमिका बजावणार आहेत.दरम्यान, प्रशासनाने या विधानपरिषद निवडणुकीसाठी जुलै २०२६ ही 'डेडलाईन' गृहित धरून तयारी सुरू केली आहे. मतदार यादी अद्ययावत करणे, निवडणूक प्रक्रियेचे नियोजन आणि आवश्यक प्रशासकीय तयारीवर भर दिला जात आहे. मात्र, सर्व प्रक्रिया अखेर अमरावती जिल्हा परिषदेच्या निवडणुकीवर अवलंबून असल्याने, आरक्षणाचा प्रश्न सुटण्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. जिल्हा परिषदेची निवडणूक होताच 'लोकल बॉडी' विधानपरिषदेच्या रणधुमाळीला वेग येणार, हे मात्र निश्चित मानले जात आहे.

### ५२८ सदस्य असणार मतदार

अमरावती जिल्हा स्थानिक स्वराज्य संस्था विधानपरिषद निवडणुकीत एकूण ५२८ मतदार असतील. यात अमरावती महापालिका, जिल्हा परिषद, नगरपरिषद समितीचे सदस्य आणि नगरपंचायत समिती सभापत यांना मतदानाचा अधिकार मिळणार आहे. ठरावीक मतदार संख्या राहत असली तरी आतापर्यंत विरोधी पक्षाचा उमेदवार निवडून आल्याचा अमरावती जिल्ह्याचा इतिहास आहे. त्यामुळे या विधानपरिषद निवडणुकीत पक्ष, जात, धर्म यापेक्षा उमेदवार कोण? याला अधिक पसंती दिली जाते. २२०० दिवस उमेदवारांचा मतदारांशी संपर्क हेसुद्धा या निवडणुकीत महत्त्वाचे ठरते.

# डायबिटीज रुग्णांसाठी दिलासादायक पाऊल - अमरावतीत 'मॅग्नेटिक फुट थेरपी'

## पायलट प्रोजेक्टसाठी केंद्रीय मंत्र्यांचा सकारात्मक प्रतिसाद : भाजप नेते तुषार भारतीय यांची विशेष मागणी



विदर्भ प्रजासत्ताक
दि.२३अमरावती

केंद्रीय आयुष मंत्री ना. प्रतापराव जाधव यांची भाजप नेते तुषार भारतीय यांनी नुकतीच दिल्ली येथे भेट घेऊन आयुष मंत्रालयाच्या माध्यमातून चालणाऱ्या दवाखान्यांमध्ये हेवी डायबिटीज असलेल्या रुग्णांसाठी विशेष उपचार पद्धत लागू करण्याबाबत सविस्तर चर्चा केली. विशेषतः मधुमेहामुळे पायाला जखमा होणाऱ्या रुग्णांसाठी 'मॅग्नेटिक फुट उपचार पद्धती'चा पायलट प्रोजेक्ट अमरावती जिल्ह्यात तसेच महाराष्ट्रात राबविण्याचा प्रस्ताव या भेटीत मांडण्यात आला.डायबिटीज रुग्णांमध्ये पायाला जखमा होणे, संसर्ग वाढणे व पुढे गंभीर गुंतागुंत निर्माण होण्याचे प्रमाण वाढत असून, यावर प्रतिबंधात्मक व प्रभावी उपाययोजना आवश्यक आहेत. या पार्श्वभूमीवर आयुष मंत्रालयांतर्गत चालणाऱ्या दवाखान्यांमधून मॅग्नेटिक फुट थेरपीसारख्या पूरक उपचार पद्धती राबविल्यास रुग्णांना मोठा दिलासा मिळू शकतो, असा मुद्दा बैठकीत अधोरेखित करण्यात आला.या प्रस्तावावर केंद्रीय मंत्री ना. प्रतापराव जाधव यांनी तुषार भारतीय यांना सकारात्मक प्रतिसाद देत, पायलट प्रोजेक्टच्या स्वरूपात अमरावती जिल्ह्यात सुरुवात करण्याबाबत अनुकूलता दर्शविली. आवश्यक तांत्रिक बाबी, तज्ज्ञांचा सल्ला व आयुष मंत्रालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार पुढील कार्यवाही करण्याचे संकेतही त्यांनी दिले.हा पायलट प्रोजेक्ट यशस्वी ठरल्यास, महाराष्ट्रभर तसेच देशातील इतर भागांतही ही उपचार पद्धत राबविण्याचा मार्ग मोकळा होणार असून डायबिटीज रुग्णांसाठी ही एक महत्त्वाची आरोग्यविषयक उपलब्धी ठरेल.

# अमरावतीत काँग्रेसच्या १५ नगरसेवकांचा सत्कार

## शहर विकासासाठी एकजुटीने काम करण्याचे आवाहन



विदर्भ प्रजासत्ताक
दि.२३अमरावती

अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीत भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या वतीने विजयी ठरलेल्या १५ नगरसेवक व नगरसेविकांचा भव्य सत्कार समारंभ गुरुवार, दि. २२ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ७.३० वाजता हॉटेल प्राईम पार्क, अमरावती येथे पार पडला. अमरावती शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समर्थकांची मोठी उपस्थिती होती.या सत्कार समारंभाच्या अध्यक्षस्थानी शहर काँग्रेस अध्यक्ष बबलु शेखावत होते. प्रमुख पाहुणे म्हणून माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख, माजी महापौर विलास इंगोले, माजी महापौर मिलिंद चिमोटे, प्रदेश उपाध्यक्ष भैय्या पवार, माजी महापौर अशोक डोंगरे, प्रदेश सचिव आसिफ तवक्कल तसेच प्रदेश सचिव हाजी नजीर खान बी.के. यांची उपस्थिती लाभली.माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख यांनी आपल्या भाषणात धनशक्ती व प्रस्थापित व्यवस्थेविरोधात संघर्ष करून निवडून आलेल्या सर्व विजयी नगरसेवक व नगरसेविकांचे अभिनंदन केले. येणाऱ्या काळात अमरावती शहराचा सर्वांगीण विकास, शहराचे सौंदर्यीकरण तसेच नागरिकांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी काँग्रेसचे सर्व लोकप्रतिनिधी कटिबद्ध राहतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.शहराध्यक्ष बबलु शेखावत यांनी काँग्रेस पक्षाने अन्यायाविरुद्ध सातत्याने लढा दिल्याचे नमूद केले. निवडणुकीत नागरिकांना दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्यासाठी सर्व नगरसेवक व नगरसेविकांनी महापालिकेच्या सभागृहात प्रभावी व आक्रमक भूमिका घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले.माजी महापौर विलास इंगोले यांनी शहरातील पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर संघर्ष करण्यासाठी काँग्रेसचे नगरसेवक सदैव तत्पर राहतील, अशी अपेक्षा व्यक्त केली. तर माजी महापौर मिलिंद चिमोटे यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत काँग्रेसच्या १५ नगरसेवक व नगरसेविकांच्या विजयाचे विशेष कौतुक केले. महिलांचे लक्षणीय प्रतिनिधित्व आणि सर्व समाजघटकांचा समावेश ही काँग्रेसची मोठी जमेची बाजू असल्याचे त्यांनी सांगितले.या सत्कार समारंभातून काँग्रेसच्या नगरसेवक व नगरसेविकांना नवचैतन्य व प्रोत्साहन मिळाले असून, आगामी काळात ते शहराच्या विकासासाठी व नागरिकांच्या हितासाठी एकजुटीने कार्य करतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

# मुंबईतही मनसेचा पाठिंबा घेणार का?; एकनाथ शिंदेंनी एका वाक्यात सगळं सांगून टाकलं

विदर्भ प्रजासत्ताक दि. २३ मुंबई

कल्याण-डोंबिवलीत उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचा हात सोडत मनसेचे नगरसेवक शिंदेंच्या मांडीला मांडी लावून बसलेत. त्यामुळे आता मुंबईतही मनसे तोच कित्ता गिरवणार का, याची उलटसुलट चर्चा सुरु झाली आहे. त्यातच आता राजकारणात काहीही होऊ शकतं असं सावध विधान करत मनसेचे नेते बाळा नांदगावकरांनी चर्चेला एकप्रकारे हवा दिली आहे. त्यानंतर आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एक महत्वाचं विधान केलं आहे.

मुंबईतही मनसेचा पाठिंबा घेणार का?, असा प्रश्न विचारण्यात आला. यावर जर आणि तर वर बोलण्यापेक्षा आता काय आहे, त्यावर बोला, असं एकनाथ शिंदे म्हणाले. तसेच मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, नवी मुंबईमध्ये महायुतीचा महापौर होणार, असंही एकनाथ शिंदेंनी सांगितले.

दरम्यान, मुंबईत बहुमताचा ११४ आकडा एकाही पक्षाला ओलांडता आलेला नाही. भाजप ८९, शिवसेना शिंदे गट २९, उद्धव ठाकरेंचे ६५ आणि मनसेचे ६ नगरसेवक निवडून आले आहेत. शिंदेंना सोबत घेऊन भाजप सत्तास्थापनेचा दावा करण्याच्या तयारीत आहे. मात्र राज ठाकरेंच्या मनसेलाही सोबत घेत युती बेरजेचं राजकारण करणार की कोणती नवी खेळी करणार, हे पाहाणं महत्वाचं ठरणार आहे.

मुंबई महापालिका निवडणुकीत बाजी मारलेल्या भाजप-शिवसेना शिंदेंच्या पक्षांमध्ये पालिकेतील महत्वाच्या पदांबाबत अंतिम वाटाघाटी जवळपास निश्चित झाल्याची माहिती समोर आली आहे. शिवसेनेकडून भाजपकडे महापौर किंवा स्थायी समिती अध्यक्षपदाची मागणी केली जात आहे.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत